www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
■ वर्ष - ०२ ■ अंक २१५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, १० जानेवारी २०२५ ■ रु. २/-
■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



■ ठाणे महापालिकेत १०० दिवसांच्या कार्यक्रमाचे... पान ३ वर....



■ संग्रहालयांच्या माध्यमातून सांस्कृतिक श्रीमंतीचे दर्शन... पान ६ वर....

# नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शहरांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ■ नगरविकास विभागाच्या १०० दिवसांच्या कामांचे सादरीकरण

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यातील ४२३ शहरांमधील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी या शहरांमध्ये सर्व अत्यावश्यक आणि दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

नगरविकास विभागामार्फत येत्या १०० दिवसात करावयाची कामे आणि उपाययोजनांबाबत मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सादरीकरणाद्वारे चर्चा करण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर



मुख्य सचिव राजगोपाल देवरा, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव नवीन सोना, नगरविकास -२ विभागाचे प्रधान सचिव डॉ. के.एच.गोविंदराज आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. तथापि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या शहरांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देताना घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन करणे

■ प्रधान सचिव डॉ.गोविंदराज यांनी सादरीकरणाद्वारे विभागाच्या १०० दिवसांच्या नियोजनाबाबत माहिती दिली. यानुसार शहरांच्या शाश्वत विकासासाठी धोरण निश्चिती, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक बळकटीकरणासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना, प्रशासकीय सुधारणा आणि बळकटीकरण, ई-गव्हर्नन्स प्रकल्पांना चालना, तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर उत्पन्न वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बंधनकारक करावे. सर्व नगरपरिषदांमधील मालमत्तांचे जीआयएस प्रणाली आधारित कर निर्धारणामध्ये सुधारणा करताना नियोजन करून तो दीडपटीपेक्षा अधिक होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी केल्या. शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याच्या पुनर्वापराचे पारदर्शी धोरण ठरवा, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, नागरिकांना सोयी सुविधा देताना त्यावर कर आकारला जातो. तथापि, हा कर अनेक वर्षांनंतर सुधारित केला तर नागरिकांवर त्याचा अधिक बोजा पडतो. यासाठी त्यामध्ये नियमित परंतु अल्पवृद्धी करावी, जेणेकरून तो भरणे नागरिकांना शक्य होईल.



# ठाण्यात कर थकबाकीदारांवर कारवाईची चिन्हे

● ठाणे, सम्यक कासारे :

आपापल्या विभागातील मोठे थकबाकीदार शोधून त्यांच्याकडून चालू वर्षीची रक्कम आणि थकबाकी वसुल करण्यासाठी कृती आराखडा निश्चित करण्याबरोबरच आवश्यक तेथे जप्ती, पाणी पुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात यावी, असे आदेश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्तांना बैठकीत दिले आहेत. यामुळे शहरातील मोठ्या कर थकबाकीदारांवर कारवाईची चिन्हे आहेत. ठाणे महापालिकेच्या २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये मालमत्ता कर विभागाला ८५७ कोटी रुपयांच्या कर वसुलीचे उद्दीष्ट ठरवून देण्यात आले आहे. मालमत्ता कर हा पालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत मानला जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या कामात अधिकारी आणि कर्मचारी व्यस्त होते. यामुळे नोव्हेंबर महिन्यात मालमत्ता कर वसुलीवर परिणाम झाला होता. पान २ वर

# मुंबई महापालिकेची निवडणूक ठाकरे गट स्वबळावर लढणार?

● मुंबई, राकेश गायकवाड:

मुंबई विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला अपयशाला सामोरं जावं लागलं. विधानसभेच्या निवडणुकीत झालेल्या पराभवावर आघाडीच्या नेत्यांकडून विचारमंथन करण्यात येत आहे. तसेच आगामी महापालिकेच्या निवडणुकीची तयारीही सर्वच राजकीय पक्षांकडून आतापासून सुरु करण्यात आली आहे. दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट आतापासून सावध पावलं



टाकत असल्याची चर्चा आहे. तसेच मुंबई महापालिकेची निवडणूक ठाकरे गट स्वबळावर लढणार असल्याची चर्चा आहे. आता यासंदर्भात ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठं भाष्य केलं आहे. "दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस आणि आम आदमी पक्षात जे घडलं तेच कदाचित उद्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत होऊ शकतं", असं सूचक भाष्य संजय राऊत यांनी केलं आहे.

"इंडिया आघाडीचं नेतृत्व काँग्रेस करत आहे. मात्र, केजरीवाल यांच्या सारख्या नेत्यांच्या विरोधात ज्या प्रकारे प्रचार केला जात आहे, त्याच्याशी आम्ही सहमत नाही. पण निवडणुका एकमेकांच्या विरोधात लढवू शकतात. दिल्ली हा केंद्रशासित प्रदेश आहे. त्यामुळे निवडणुका फक्त बहाणा आहेत. कारण त्या ठिकाणी अमित शाह, पंतप्रधान मोदी हे तेथील सरकारला काम करू देत नाहीत. पान २ वर

## संजय राऊत काय म्हणाले?

■ "आम्ही अनेकदा म्हटलं आहे की काँग्रेस मोठा पक्ष आहे. मात्र, दिल्लीत आम आदमी पक्ष मोठा पक्ष आहे. निवडणुका लढवताना कार्यकर्त्यांचा एक प्रकारचा दबाव असतो. विधानसभा असो किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असो. पण दिल्लीत आम आदमी पक्ष अर्थात केजरीवाल यांची ताकद जास्त आहे. सध्या दिल्लीतील वातावरण असं आहे की दिल्लीच्या निवडणुकीत आम आदमी पक्ष मोठ्या मताधिक्यांनी जिंकेल. आमच्या पक्षाला दु:ख आहे की काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने एकमेकांवर टीका टिप्पणी करणं योग्य नाही", असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

# पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केली ठाणे जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनांच्या कामांची पाहणी


## ■ मिशन मोडवर काम करून जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा - पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील



● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित कराव्यात, संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच कंत्राटदारांनी नेमून दिलेली कामे गांभीर्यपूर्वक लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशा अत्यंत कठोर शब्दात सूचना राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे दिल्या. पान २ वर

# अधिकाऱ्यांच्या उत्तराने वनमंत्री नाराज, वनाधिकाऱ्यांना दिली तंबी...



● नागपूर, नितीन देवळेकर :

पैसे भरुन व्याघ्रप्रकल्पात कॅमेरे नेता येतात, मग भ्रमणध्वनीवरच बंदी का, असा थेट प्रश्न वनमंत्री गणेश नाईक यांनी वनाधिकाऱ्यांना विचारला. त्यावर अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराने वनमंत्री समाधानी झाले नाहीत आणि त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

-पवनी- कऱ्हांडला अभयारण्यात ३१ डिसेंबरला पर्यटकांच्या वाहनांनी 'एफ-२' वाघीण आणि तिच्या बछड्याची बराच वेळपर्यंत वाट अडवली. समाजमाध्यमावर ही चित्रफित व्हायरल होताच सर्वच स्तरातून त्यावर तीव्र पडसाद उमटले.

स्थानिक पातळीवर तोकडी कारवाई झाल्यानंतर 'लोकसत्ता'ने यासंदर्भात वृत्त प्रकाशित केले. यानंतर पर्यटक वाहनचालक आणि मार्गदर्शक यांच्यावरील निलंबन कारवाईत वाढ करण्यात आली. तसेच दंडात देखील वाढ करण्यात आली. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने 'लोकसत्ता'च्या वृत्ताची दखल घेत स्वत:हून याचिका दाखल करुन घेतली आणि राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षकांना यावर उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, काल आणि आज ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पात वाढत्या वन्यप्राण्यांच्या व्यवस्थापनावर राष्ट्रीय पातळीवर परिषद सुरू आहे. पान २ वर

# रत्नागिरीनजीक कर्नाटकची घुसखोरी केलेली नौका गस्तीपथकाने पकडली

● रत्नागिरी, आकांक्षा नार्वेकर :

मलपी कर्नाटक येथील मासेमारी नौकांचे अतिक्रमण केल्याची बाब मच्छीमारांकडून ८ जानेवारी रोजी रात्रौ मिळताच जिल्ह्याची गस्ती नौका गोळप-पावस या दिशेने मार्गक्रमण करण्यात आली. काल रात्री सुमारे ११ ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान मलपी येथील ३५ – ४० हायस्पीड ट्रॉलर नौका निदर्शनास आल्या. या नौकांचा पाठलाग करत असता नौका "अधिरा" IND-KL-02-MM5724 या नौकेचा ताबा घेताना इतर नौकांनी गस्ती नौका घेरण्याचा प्रयत्न केला.

तसेच पकडलेल्या नौकांवरील खलाशांनी



गस्ती नौकेवरील कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान प्रसंगावधान राखून पकडलेली नौका सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतली.इतर नौकांनी घेरण्याचा प्रयत्न केल्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य पाहून नौकेवरील कर्मचाऱ्यांनी सदर बाब सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या निदर्शनास आणताच आजूबाजूच्या मासेमारी करणाऱ्या लोकांना संदेश देऊन गस्ती नौकेला मदत करण्यासाठी विनंती करण्यात आली. पान २ वर

# ड्रोन प्रणालीमुळे सागरी सुरक्षा होणार भक्कम – मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे

● मुंबई, विशाल पाटील :

**राज्यातील सागरी क्षेत्रात होणारी अवैध मासेमारी तसेच घुसखोरी रोखण्यासाठी ड्रोनद्वारे देखरेख विशेष प्रणाली सुरु करण्यात आली आहे. या ड्रोन प्रणालीमुळे राज्यातील ७ जिल्ह्यातील ९ सागर किनाऱ्यांची सुरक्षा आणखी मजबूत होणार असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मत्स्य आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मत्स्यव्यवसाय मंत्री श्री. राणे यांच्या हस्ते ड्रोन देखरेख प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचा पहिला १०० दिवसांचा आराखडा तयार केला असल्याचे सांगून मंत्री श्री. राणे म्हणाले की, ड्रोन यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या ७२० किलोमिटर लांबीच्या सागरी किनाऱ्यावरून राज्याच्या १२ मैल सागरी हद्दीपर्यंत बेकायदा मासेमारी करणाऱ्या अवैध नौकांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. अशा अनधिकृत नौकांची माहिती घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी ड्रोन वेब सोल्युशन्स स्ट्रिमिंगचा पुरावा म्हणून



वापर केला जाणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला चाप बसणार आहे. ड्रोन यंत्रणेमुळे राज्यातील सागरीक्षेत्र हे कॅमेऱ्याच्या नियंत्रणात येणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला आळा घालणे शक्य होणार आहे. श्री. राणे म्हणाले, बाहेरून येणाऱ्या ट्रॉलर्स, मोठ्या बोटी, यामुळे स्थानिक मच्छीमारांचे मोठे नुकसान होते. स्थानिकाच्या उत्पन्नात घट होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होतो.

त्यावर नियंत्रण मिळावे, जरब बसावी यासाठी आधुनिक तंत्र प्रणालीच्या माध्यमातून सकारात्मक पाऊल उचलण्याच्या दृष्टीने मत्स्य व्यवसाय विभागाने ड्रोन च्या माध्यमातून पहिले पाऊल टाकले आहे. ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार असल्याने सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वेग जास्त असल्याने एकाचवेळी अधिक क्षेत्र ड्रोनच्या देखरेखाली येणार आहे. एका दिवसात १२० सागरी मैलाचे सर्वेक्षण करण्यात येईल. तसेच एका दिवसात सहा तास सर्वेक्षण करणे बंधनकारक असेल. ड्रोनमधून प्राप्त झालेली माहिती संबंधित जिल्हा कार्यालयात उपलब्ध करून दिली जाईल. मेक इन इंडिया अंतर्गत हे ड्रोन विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून समुद्रात होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार असून अवैधरित्या मासेमारी करणाऱ्यावर कारवाई करून जास्तीत जास्त दंड आकारला जाणार आहे. या ड्रोनच्या माध्यमातून छायाचित्रे उपलब्ध होणार आहेत. हे सर्व पुरावे विभागास प्राप्त होऊन कारवाई करण्यास गती मिळणार असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले. पान २ वर

## ७ जिल्ह्यांतून होणार ९ ड्रोनचे उड्डाण

■ पालघर जिल्ह्यातील शिरगाव, ठाणे जिल्ह्यातील उत्तन, मुंबई उपनगर जिल्ह्यातील गोराई, मुंबई शहर जिल्ह्यामधील ससून गोदी, रायगड जिल्ह्यातील रेवदंडा, श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा, साखरी नाटे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या नऊ समुद्रकिनाऱ्यावरून ९ ड्रोन उडवले गेली.

## संपादकीय

# चीनच्या पुन्हा कुरापती

चीनने पुन्हा एकदा भारताची कुरापत काढणे सुरू केले आहे. सीमावर्ती भागात प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालण्यासंदर्भात उभय देशांदरम्यान दोनच महिन्यांपूर्वी समझौता झाला होता. त्यामुळे २०२० पासून निर्माण झालेला तणाव निवळण्याची आशा निर्माण झाली असतानाच, आता चीनने दोन नवे परगणे (काउंटी) निर्माण करून त्यामध्ये अक्साई चीनचा काही भाग समाविष्ट करीत, पुन्हा आगळीक केली आहे. त्याशिवाय तिबेटमध्ये भारताच्या सीमेलगत ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वात मोठे धरण बांधण्याच्या चीनच्या निर्णयामुळेही भारत चिंताक्रांत झाला आहे. अक्साई चीन, भारत आणि चीनदरम्यानच्या सीमा विवादाच्या दोन प्रमुख मुद्द्यांपैकी एक आहे. चीनने १९५० च्या दशकात तिबेटवर कब्जा केला आणि पश्चिम तिबेटला चीनच्या मुख्य भूमीशी जोडण्यासाठी शिंजियांग-तिबेट महामार्गाची निर्मिती केली. हा महामार्ग भारताचा भूभाग असलेल्या अक्साई चीनमधून जातो. भारताला चीनचा हा उपद्व्याप कळल्यावर भारताने अक्साई चीन भूभाग पुन्हा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले; पण ते अयशस्वी ठरले. चीनच्या साम्राज्यवादी भूमिकेची ही परिसीमा म्हटली पाहिजे. मुळात तिबेट हा स्वतंत्र देश चीन बळकावला आणि त्याचा भाग असल्याचा दावा करीत, भारताचा अक्साई चीन भूभागही हडपला! आता त्या भूभागापैकी काही भागाचा दोन नव्या परगण्यात समावेश करून चीनने नव्याने भारताची कुरापत काढली आहे. एवढेच नव्हे, तर भारताच्या सीमेलगत जगातील सर्वात मोठे धरण बांधण्याच्या निर्णयाची भारताला माहिती देण्याची तसदी घेण्याचीही गरज चीनला वाटली नाही. वस्तूतः ब्रह्मपुत्रा नदी तिबेटमधून भारतात वाहत येते आणि पुढे बांगलादेशातून मार्ग काढत बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संकेतांनुसार, धरण बांधण्याचा निर्णय भारत आणि बांगलादेशला कळविणे, ही चीनची जबाबदारी होती; परंतु चीनने आंतरराष्ट्रीय कायदे किंवा संकेतांची कधीच तमा बाळगली नाही, हा इतिहास आहे. भारतात विनाश घडवून आणण्यासाठी चीन प्रस्तावित महाकाय धरणातील जलसाठ्याचा कधीही उपयोग करू शकतो. त्यामुळे भारताला चिंता वाटणे स्वाभाविक आहे. अलीकडील काळात कमावलेली सुबत्ता आणि त्यायोगे वाढवलेल्या लष्करी बळाच्या जोरावर चीन खूपच उन्मत्त झाला आहे.व्हिएतनाम, कंबोडिया, फिलिपाइन्स, मलेशिया, इंडोनेशिया, ब्रुनेई इत्यादी देशांच्या आक्षेपांची तमा न बाळगता संपूर्ण दक्षिण चीन सागरावर हक्क सांगणे, त्याचप्रमाणे भारताचे आक्षेप धुडकावत, पाकिस्तानने बळकावलेल्या पाकव्याप्त काश्मीरमधून चीन-पाकिस्तान आर्थिक महामार्गांची निर्मिती करणे, ही चीनच्या उन्मत्तपणाचीच उदाहरणे आहेत. त्यामागे आमचे कोण काय वाकडे करू शकतो, हा दर्प आहे.ताटाखालचे मांजर झालेल्या पाकिस्तानशिवाय इतर एकाही शेजारी देशाशी चीनचे सख्य नाही. त्यातही भारताची सातत्याने आगळीक काढण्याचा तर चीनला जणू काही शौक लागला आहे. आशिया खंडात एकटा भारतच काय तो चीनच्या डोळ्यात डोळा घालू शकतो. त्यामुळे जिथे आम्ही भारतालाच भीक घालत नाही, तिथे तुमचा काय पाड, असा इतर शेजाऱ्यांना संदेश देण्यासाठी चीन जाणीवपूर्वक ठराविक अंतराने भारताची खोडी काढतो की काय, अशी शंका घेण्यास जागा आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील भारत-चीन संबंधांवर दृष्टिक्षेप टाकल्यास असे लक्षात येते, की एका भागात घुसखोरी करून तो भाग विवादास्पद करायचा, काही काळ त्या विवादासंदर्भात चर्चेचे गुऱ्हाळ सुरू ठेवायचे, मग काही तरी समझौता करायचा आणि थोड्याच अवधीत पुन्हा दुसऱ्या एखाद्या भागावर हक्क सांगून अथवा घुसखोरी करून नव्या विवादास जन्म द्यायचा, ही चीनची रणनीती बनली आहे. ब्रिटिशांनी भारत सोडून जाताना भारत-चीन सीमारेषेची निश्चित आखणी केली नसल्याने चीनचे आयतेच फावते. अलीकडे भारतानेही अरेला कारे उत्तर देणे सुरू केल्याने चीन काहीसा नरमला आहे; पण त्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा आकार आणि लष्करी सामर्थ्य भारताच्या तुलनेत बरेच मोठे असल्याने, जोपर्यंत अर्थव्यवस्था, लष्करी तयारी आणि तंत्रज्ञान या सर्व आघाड्यांवर भारत चीनच्या तोडीस तोड होत नाही, तोपर्यंत चीनची दादागिरी सुरूच राहणार आहे. भारतीय राजकीय नेतृत्वाने हे उमजून घेतलेले बरे! त्यातही परस्परांच्या कार्यकाळात चीनने भारताचा किती भूभाग हडपला, या मुद्दयावरून जाहीर वाद घालणे तर तातडीने बंद करायला हवे.

## आजची चित्रोळी



आपलेपणा जपला
तरच जवळीक होते !
जीव लावणारे नातेच
खऱ्या मायेचे सुख देते !!
मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# गोड गळ्याचे गायक ; येसुदास



आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८५ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# विधिमंडळ सभागृहात नव्याने कार्यान्वित केलेल्या संगणक कार्यप्रणालीविषयी सदस्यांना सुयोग्य पद्धतीने अवगत करावे – विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे

मुंबई (विशाल पाटील) :- विधिमंडळ सभागृहात नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या संगणक कार्यप्रणालीविषयी सदस्यांना सुयोग्य पध्दतीने अवगत करण्यात यावे. सभागृह कामकाजातील सदस्यांचा सहभाग वाढावा यादृष्टीने सर्वोतपरी मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सदस्यांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांबाबत तत्परतेने कार्यवाही व्हावी,असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

विधान भवन, मुंबई येथे आज विधानमंडळ कामकाज आढावासंदर्भात सभापती प्रा. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्याप्रसंगी प्रा. शिंदे बोलत होते. यावेळी



विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ (कार्यभार) जितेंद्र भोळे, सचिव-२ (कार्यभार) डॉ. विलास आठवले आणि विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विधानपरिषद सभापती प्रा. शिंदे म्हणाले की, बांधकाम सुरू असलेल्या नूतन मनोरा आमदार निवासचे बांधकाम सुरू झाले असून त्यामध्ये सभागृह, वाचनालय, अद्ययावत वाहनतळ, सुसज्ज भोजन कक्ष, सदस्य आणि सहायकांसाठीची प्रशस्त निवास व्यवस्था उपलब्ध असणार आहे. मॅजेस्टीक आमदार निवासचे देखील वारसा वास्तुवैभव कायम ठेऊन अतिशय देखणे असे नुतनीकरण करण्यात येत आहे.

## पान १ वरून...

### ठाण्यात कर थकबाकीदारांवर कारवाईची...

निवडणुक संपताच ठाणे पालिका आयुक्त सौरभ राव यांनी मालमत्ता कर वसुलीवर भर देण्यास सुरूवात केली आहे. त्याचे सकारात्मक परिणाम डिसेंबर महिनाअखेर दिसून आले होते. डिसेंबर महिनाअखेरपर्यंत ५६४ कोटी रुपयांच्या मालमत्ता कराची वसुली केली असून गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा ३७ कोटी रुपयांनी करवसुली अधिक झाली आहे. गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात अभय योजनेच्या सवलतीमुळे ७२ कोटींची वसुली झाली होती. तर, यंदाच्या डिसेंबर महिन्यात अभय योजनेविना ७८ कोटींची कर वसुली झाली आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मालमत्ता कराच्या वसुलीत वाढ झाली असली तरी मालमत्ता कर वसुलीचे उद्दीष्ट गाठण्यासाठी अडीच महिनेच शिल्लक राहिले आहेत. मालमत्ता कराच्या वसुलीचे उद्दीष्ट ८५७ कोटी रुपये असून आतापर्यंत ५७६ कोटींची वसुली झाली आहे. तर, पाणी देयकांच्या थकबाकीसह चालू वर्षाच्या वसुलीचे लक्ष्य २२५ कोटी रुपये असून त्यापैकी ८० कोटींची वसुली झालेली आहे. यामुळे उर्वरित कर वसुलीसाठी आयुक्त सौरभ राव यांनी नुकतीच एक बैठक घेऊन अधिकाऱ्यांना महत्वाच्या सुचना केल्या. मालमत्ता कर आणि पाणी देयकातून येणारा महसुल हा महापालिकेच्या आर्थिक नियोजनाचा सगळ्यात महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे या दोन्हींच्या वसुलीची उद्दिष्ट पूर्ती तातडीने व्हावी, असे आयुक्त राव यांनी बैठकीत स्पष्ट केले. परिमंडळ उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांनी आपापल्या विभागातील मोठे थकबाकीदार शोधून त्यांच्याकडून चालू वर्षीची रक्कम आणि थकबाकी वसुल करण्यासाठी कृती आराखडा निश्चित करावा. आवश्यक तेथे जप्ती, पाणी पुरवठा खंडित करण्याची कारवाईही करण्यात यावी. तसेच, प्रलंबित वसुली, त्यातून वसुलीची शक्यता, त्यासाठीचे नाविन्यपूर्ण मार्ग शोधून पुढील दोन महिन्यांच्या काळात वसुलीचे उद्दीष्ट पूर्ण करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महापालिकेकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांबाबतचे कार्यालयीन कामकाज कमीत कमी वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिकेच्या सर्व यंत्रणेने कृती कार्यक्रम हाती घ्यावा. त्याअनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचे काटेकोर आयोजन आणि यशस्वी अमलबजावणी करण्याचे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. यानुसार, ठाणे महापालिकेनेही कार्यक्रम निश्चित केला आहे. त्यात, नागरी सुविधांच्याबाबतीत कार्यालयीन कामकाज कमीत कमी वेळेत पूर्ण करण्यात यावे. महापालिकेचे संकेतस्थळ सुसज्ज करणे. माहिती अधिकाराचा वापर करून नागरिक जी सर्वसामान्यपणे उपलब्ध असलेली माहिती विचारतात ती विभागांनी आधीच पारदर्शकपणे संकेतस्थळावर उपलब्ध करावी. महापालिका मुख्यालयासह सर्व कार्यालयांमध्ये सर्वंकष स्वच्छता मोहीम राबवून अनावश्यक गोष्टी काढून टाकाव्यात, यांचा समावेश आहे.

### मुंबई महापालिकेची निवडणूक ठाकरे गट...

दिल्लीत काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने जर निवडणुका एकत्र लढवल्या असत्या तर आम्हाला आनंद झाल असता'', असं संजय राऊतांनी म्हटलं.

**दिल्लीत ठाकरे गटाचा पांठिबा कोणाला?**

दिल्लीच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचा पांठिबा कोणाला असं विचारलं असता संजय राऊत यांनी म्हटलं की, "आम्ही या संदर्भात अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. आम्ही महाराष्ट्रात काँग्रेसच्या बरोबर आहोत. लोकसभेतही आम्ही काँग्रेसच्या बरोबर आहोत. आम आदमी पक्षही आमचा मित्र पक्ष आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांनी प्रचारात बॅलन्स राखला पाहिजे. याबाबत आमची उद्धव ठाकरे यांच्याबरोबर चर्चा होईल त्यानंतर ते यासंदर्भात निर्णय घेतील. दिल्लीत काय निर्णय घ्यायचा? यासाठी आमच्या सारखे अजून काही पक्ष आहेत ते संभ्रमात आहेत. कारण दोन्ही पक्ष आमचे मित्र पक्ष आहेत. आम आदमी पक्ष आणि काँग्रेसने एकत्र भाजपाच्या विरोधात निवडणूक लढवली असती तर योग्य झालं असतं. पण आता दिल्लीची निवडणूक कार्यकर्त्यांवर सोडली पाहिजे'', असं संजय राऊत यांनी म्हटलं.

**'...तेच कदाचित मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत होईल'**

"इंडिया आघाडी जी बनली ती लोकसभेच्या निवडणुकीसाठी होती. त्या आघाडीला तुम्ही सर्व निवडणुकीत जोडू नका. महाराष्ट्रात आम्ही महाविकास आघाडी आणि केंद्रात आम्ही इंडिया आघाडीबरोबर आहोत. मात्र, एवंढ नक्की आहे की केजरीवाल आणि त्यांचे सहकारी आमच्या संपर्कात जास्त असतात. 'आप''च्या नेत्यांशी शिवसेनेच्या नेत्यांमध्ये चांगला संवाद असतो. दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत 'आप' आणि काँग्रेस एकत्र लढले असते तर अधिक चांगला निकाल मिळवू शकले असते. पण दुर्दैवाने महानगरपालिका, नगरपंचायत किंवा दिल्ली सारख्या विधानसभेच्या निवडणुका यामध्ये कार्यकर्त्यांच्या दबावामुळे या गोष्टी शक्य होत नाहीत. आता जे दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस आणि आम आदमी पक्षात घडलं तेच कदाचित उद्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत देखील होऊ शकतं. कारण शेवटी ज्या लहान निवडणुका असतात त्या ठिकाणी कार्यकर्त्यांचं मनोबल राखण्यासाठी जास्तीत जास्त जागा लढणं जास्त महत्वाचं असतं'', असं सूचक भाष्य संजय राऊत यांनी केलं आहे.

### पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव...

राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनांच्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली. मंत्री श्री.पाटील यांनी पडघा, वाशिंद, आसनगाव, चेरपोली, खर्डी येथे भेट दिली.

या दौऱ्यादरम्यान मंत्री महोदयांसमवेत आमदार शांताराम मोरे, ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे, जिल्हा परिषद जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक प्रमोद काळे, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता तन्मय कांबळे आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री श्री.पाटील म्हणाले की, नुकतीच मंत्रालयात ठाणे आणि शहापूर जिल्ह्याची आढावा बैठक घेण्यात आली. पाणीपुरवठा संबंधित काही योजना आहेत, त्या योजनांची पाहणी करणे, अपूर्ण योजना पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक कार्यवाही आणि अंमलबजावणी गतिमान करणे, त्यासोबतच बंद असलेली कामे बंद का आहेत, त्यासंबंधी अडचणी काय आहेत, त्या जाणून घेण्यासाठी या दौऱ्याचे नियोजन करण्यात आले. या दौऱ्यात स्थानिक आमदार तसेच लोकप्रतिनिधीही सोबत असणार आहेत. आपल्या देशाचा "हर घर जल...हर घर नल" हा एक ड्रीम प्रोजेक्ट आहे. तो पूर्णत्वास येण्याकरिता हा दौरा आहे. त्यानुषंगाने या दौऱ्यात माहिती घेण्याचा आमचा प्रयत्न आहे.ठाणे जिल्ह्यातील धरणांबाबत सांगताना श्री.पाटील पुढे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे याकरिता पाठपुरावा करीत आहेत. धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल, यासाठी आमचे प्रयत्न असणार आहेत. ठाणे जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत १ हजार ४७ कामे सुरु आहेत. त्यापैकी ७२० नळ पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण असून ३२७ कामे, घरगुती नळजोडणीची आहेत. यामध्ये शहापूर तालुक्यातील ७ कामे अद्याप सुरू झाली नाहीत. याबाबत वनविभागाचे वाईल्डलाईफची परवानगीची ४ कामे प्रलंबित आहेत. तर २ कामे जागेच्या अंतर्गत वादामुळे प्रलंबित तर एक ठिकाणी रस्ता नसल्याने तेथे जाण्याची सुविधा नसल्याने प्रलंबित आहेत. त्याचप्रमाणे जल जीवन मिशन अंतर्गत सुरु करण्यात आलेली परंतू सध्या बंद असलेली ५१ कामे आहेत. त्यासंदर्भात कार्यवाही सुरू असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

### अधिकाऱ्यांच्या उत्तराने वनमंत्री नाराज,...

या परिषदेचे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक हे देखील सहभागी झाले. त्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाला. भ्रमणध्वनी बंदी का, असा प्रश्न त्यांनी अधिकाऱ्यांना विचारला. त्यावर अधिकाऱ्यांनी 'युट्युबर' कडून अशा चित्रफिती सामाईक केल्या जातात, असे उत्तर त्यांना देण्यात आले. मात्र, वनमंत्री नाईक या उत्तराने समाधानी झाले नाहीत व त्यांनी अधिकाऱ्यांना तंबी दिली. जबाबदारी न झटकता अधिकाऱ्यांनी जबाबदारीचे भान ठेवायला हवे, असे त्यांनी वनाधिकाऱ्यांना सांगितले. एवढेच नाही तर पर्यटकांना जागृत करण्याचे काम अधिकाऱ्यांनी करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पर्यटक वाहनातून पर्यटकांना व्याघ्रदर्शन घडवलेच पाहीजे, पण त्यासाठी नियमावली आहे. त्या नियमावलीचे पालन व्हायलाच पाहीजे. अशाप्रकारच्या घटनांची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही ते म्हणाले. वाघांना त्याच्या अधिवासात शिकार मिळाली नाही तर ते बाहेर येतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर सध्या काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहे, त्याचा अभ्यास करून राज्यात देखील त्या लागू करण्यात येतील, असे ते म्हणाले. नागपुरात वाघांचे झालेले मृत्यू ही देशातली पहिली घटना आहे, प्रयोगशाळेमध्ये नमुन्यांची तपासणी करून याचे नेमके कारण शोधल्या जात आहे, या प्राण्यांच्या संपर्कात आलेल्या कर्मचाऱ्यांना देखील कुठलाही त्रास झालेला नाही, त्यामुळे यावर पुढील काही दिवसात अधिक भाष्य करता येईल, असेही वनमंत्री गणेश नाईक पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

### रत्नागिरीनजीक कर्नाटकची घुसखोरी...

दरम्यान सदर बाब निदर्शनास स्थानिक मच्छीमार यांच्या निदर्शनास येताच आठ ते दहा मासेमारी लोकांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला.पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांच्याशी संपर्क करून अतिरिक्त पोलीस बळ उपलब्ध करून मिरकरवाडा येथील नौके वरून पाठवण्यात आले. मलपी येथील नौकांनी गस्ती नौका मार्गक्रमण करीत असल्याचे पाहताच नौकेवरील दोऱ्या समुद्रात सोडल्या त्यातील दोरी गस्तीनौकेच्या फॅनमध्ये अडकल्याने गस्ती नौका जागेवर बंद पडली. गस्ती नौका बंद पडल्यामुळे इतरत्र नौकांनी हल्ला करण्याचा प्रसंग जीवावर बेतणारा होता. मात्र स्थानिक नौकांची मदत, अतिरिक्त पोलिसांची कुमक या सर्व प्रसंगावधान बाबींमुळे पकडलेली नौका तसेच गस्ती नौका टोईंग करून मिरकरवाडा बंदरात आणण्यात आल्या. सदरच्या नौकेवर म.सा. मा. नि. अ. १९८१ अंतर्गत दावा दाखल करण्याची कारवाई आज करण्यात येईल.

### ड्रोन प्रणालीमुळे सागरी सुरक्षा होणार भक्कम...

केंद्र व राज्य सरकारच्या मत्स्य व्यवसाय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही मंत्री श्री.राणे यांनी सांगितले. समुद्रकिनारा लाभलेल्या राज्यापैकी ड्रोनद्वारे देखरेख प्रणाली विकसित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी ड्रोनद्वारे देखरेख प्रणालीचे प्रात्यक्षिक झाले. यासाठी मत्स्य आयुक्त कार्यालय येथे कंट्रोल रूम उभारण्यात आला आहे.यावेळी आमदार मनीषा कायंदे, कृषी व पदुम विभागाचे सचिव रामास्वामी एन, मत्स्यव्यवसाय आयुक्त पंकज कुमार, सागरी सुरक्षा पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, मत्स्य व्यवसाय उपायुक्त दिपाली बनकर, यासह सात ठिकाणी उपस्थित असलेले मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ठाणे महापालिकेत १०० दिवसांच्या कार्यक्रमाचे काटेकोर आयोजन करण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

■ कमीत कमी कालावधीत कार्यालयीन कामकाज पूर्ण करण्याचे लक्ष्य
■ नागरिकांना दिल्या जाणाऱ्या ऑनलाईन सेवांची सज्जता
■ महापालिकेच्या सर्व कार्यालयांची सर्वंकष स्वच्छता मोहीम



**ठाणे (रोहित जैसवाल) :** नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महापालिकेकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांबाबतचे कार्यालयीन कामकाज कमीत कमी वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिकेच्या सर्व यंत्रणेने कृती कार्यक्रम हाती घ्यावा. त्याअनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचे काटेकोर आयोजन आणि यशस्वी अमलबजावणी करण्याचे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेचे सर्व वरिष्ठ अधिकारी, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख यांची आढावा बैठक बुधवारी सायंकाळी माजिवडा येथील नागरी संशोधन केंद्र येथे झाली. त्यावेळी, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे उपस्थित होते. उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे यांनी या आढावा बैठकीत विविध विभागांच्या कामगिरीबाबतचे सादरीकरण केले.

या आढावा बैठकीच्या आरंभी आयुक्त सौरभ राव यांनी राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाबाबत विवेचन केले. नागरिकांचे जीवन सुखकर करणे (इज ऑफ लिव्हिंग) याला प्राधान्य आहे. आपल्या मुलभूत कर्तव्यांचा तो महत्त्वाचा भाग असून त्यासाठी सर्व विभागांनी आपापल्या स्तरावर काटेकोर नियोजन करावे. प्रशासन सुसंगत पद्धतीने काम करीत असल्याचे नागरिकांना जाणवले पाहिजे, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमात, राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार, ठाणे महापालिकेनेही कार्यक्रम निश्चित केला आहे. त्यात, नागरी सुविधांच्याबाबतीत कार्यालयीन कामकाज कमीत कमी वेळेत पूर्ण करण्यात यावे. महापालिकेचे संकेतस्थळ सुसज्ज करणे. माहिती अधिकाराचा वापर करून नागरिक जी सर्वसामान्यपणे उपलब्ध असलेली माहिती विचारतात ती विभागांनी आधीच पारदर्शकपणे संकेतस्थळावर उपलब्ध करावी. महापालिका मुख्यालयासह सर्व कार्यालयांमध्ये सर्वंकष स्वच्छता मोहीम राबवून अनावश्यक गोष्टी काढून टाकाव्यात, यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या भेटीसाठी निश्चित वेळ ठरवून त्यावेळी शक्यतो फिल्ड व्हिजिट ठेवू नयेत. नागरिकांच्या तक्रारींचे जलद निवारण करावे. तसेच, महापालिका क्षेत्रात उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना सर्वतोपरी सहकार्य करावे. त्यांच्यासाठी आखण्यात आलेल्या धोरणांची अमलबजावणी करावी, असेही या कृती कार्यक्रमात स्पष्ट करण्यात आले आहे.

परिमंडळ उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांनी आपापल्या विभागातील मोठे थकबाकीदार शोधून त्यांच्याकडून चालू वर्षीची रक्कम आणि थकबाकी वसुल करण्यासाठी कृती आराखडा निश्चित करावा. आवश्यक तेथे जप्ती, पाणी पुरवठा खंडित करणे या कारवाईही करण्यात याव्यात. तसेच, प्रलंबित वसुली, त्यातून वसुलीची शक्यता, त्यासाठीचे नाविन्यपूर्ण मार्ग शोधून पुढील दोन महिन्यांच्या काळात वसुलीचे उद्दीष्ट पूर्ण करावे, असेही आयुक्त राव म्हणाले.

## 'मालमत्ता कर आणि पाणी बिलांची वसुली यांची उद्दिष्ट पूर्ती करावी'

■ आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत आपण आलो आहोत. मालमत्ता कर आणि पाणी बिल यातून येणारा महसुल हा महापालिकेच्या आर्थिक नियोजनाचा सगळ्यात महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे या दोन्हींच्या वसुलीची उद्दिष्ट पूर्ती तातडीने व्हावी, असे आयुक्त राव यांनी बैठकीत स्पष्ट केले. मालमत्ता कराच्या वसुलीचे उद्दीष्ट ८५७ कोटी रुपये असून आतापर्यंत ५७६ कोटींची वसुली झाली आहे. तर, पाणी बिलांच्या थकबाकीसह चालू वर्षाच्या वसुलीचे लक्ष्य २२५ कोटी रुपये असून त्यापैकी ८० कोटींची वसुली झालेली आहे.

# प्रा.डॉ.प्रदीप ढवळ लिखित 'संन्यस्त ज्वालामुखी' या चरित्र कादंबरीचा प्रकाशन सोहळा

**ठाणे (सम्यक कासारे) -** कोकण मराठी साहित्य परिषद, आनंद विश्व गुरुकुल आणि शारदा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष, लेखक, नाटककार आणि कादंबरीकार प्रा. डॉ. प्रदीप ढवळ लिखित 'संन्यस्त ज्वालामुखी' या स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आधारित चरित्रकादंबरीचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.




हा सोहळा रविवार, दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता ठाण्यातील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह (मिनी थिएटर) येथे होणार आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमासाठी मा. ना. एकनाथ संभाजी शिंदे (महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री), यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक भूषविणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून मा. ना. उदय सामंत (उद्योग व मराठी भाषा मंत्री), मा. ना. प्रताप सरनाईक (परिवहन मंत्री), तसेच मा. प्रा. डॉ. रविंद्र शोभणे ( महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ), डॉ. श्रीकांत शिंदे ( खासदार - कल्याण लोकसभा ) , मा. नरेश म्हस्के ( खासदार - ठाणे लोकसभा महाराष्ट्र प्रदेश समन्वयक शिवसेना ), मा.प्रा. डॉ.सदानंद मोरे (अध्यक्ष-महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ)मा. संजय केळकर - (आमदार ठाणे शहर), मा.अशोक समेळ ( ज्येष्ठ साहित्यिक ), मा.अशोक बागवे (ज्येष्ठ साहित्यिक ) मा. प्रवीण दवणे ( ज्येष्ठ साहित्यिक ), मा. किशोर कदम -सौमित्र (कवी, अभिनेते) , कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर, शारदा एज्युकेशनचे अध्यक्ष विलास ठुसे उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम विनामूल्य असून रसिकांनी या सोहळ्यास नोंदणी करून उपस्थित राहावे असे आवाहन शारदा प्रकाशनाचे प्रा.डॉ. संतोष राणे यांनी केले आहे.

# सरपंच हत्येच्या निषेधार्थ आबिटघर ग्रामपंचायतीचे कामकाज बंद !

**वासिंद ( विशाल पाटील)-** सरपंच हत्येच्या निषेधार्थ आबिटघर ग्रामपंचायतीनीही कामकाज बंद करून पुकारलेल्या बंदला प्रतिसाद दिला. बीड जिल्हातील मस्साजोग ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याप्रकरणी त्यांना न्याय मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेने आज दि. 9 जानेवारी रोजी ग्रामपंचायत कामकाज बंद पुकारण्यात आला. या अनुषंगाने या पुकारलेल्या बंदला वाडा तालुक्यातील




आबिटघर ग्रामपंचायत सरपंच साक्षी संतोष साठे यांनी प्रतिसाद देऊन ग्रामपंचायत कार्यालयात कै. संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली व त्या घटनेचा निषेध व्यक्त करून अत्यावश्यक सेवा वगळता बाकी पूर्णपणे कार्यालय बंद ठेवून सरपंच संघटनेने पुकारलेल्या बंदला प्रतिसाद दिला. या निषेध आंदोलनावेळी ग्रामपंचायत सदस्य कुलदीप पाटील, सुरेश बोचल व कर्मचारी उपस्थित होते. तर यासाठी उपसरपंच सुप्रिया पाटील व इतर सर्व सदस्य यांनी देखील पाठिंबा देत सहकार्य दर्शविले.



# मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते ड्रोन प्रणालीचे मुंबई येथे उद्घाटन

■ शिरगांव येथे सागर क्षेत्राचे निरीक्षण करण्यासाठी ड्रोन प्रणालीचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ

**पालघर (सुचिता सोनावणे) :-** सीमाभागातील अनधिकृत मासेमारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्यातील ७ जिल्ह्यांतील ९ समुद्र किनाऱ्यांवरून एकाचवेळी ड्रोनद्वारे देखरेख विशेष प्रणालीचे आज मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते आज मुंबई येथील मत्स्य आयुक्त कार्यालय येथे उद्घाटन झाले. याचवेळी पालघर जिल्ह्यातील शिरगाव या समुद्रकिनाऱ्यावरून पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून ड्रोन उडवण्यास प्रारंभ केला. राज्यातील ७ जिल्ह्यांतील ९ समुद्र किनाऱ्यांवरून एकाचवेळी ड्रोनद्वारे देखरेख प्रणालीचे प्रात्यक्षिक यावेळी झाली. यासाठी मत्स्य आयुक्त कार्यालय येथे कंट्रोल रूम उभारण्यात आला आहे. मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी कंट्रोल रूममध्ये उपस्थित राहून या नवीन प्रणालीला ड्रोन उडवण्यास संबंधितांना आदेश दिले. त्याचे प्रात्यक्षिक यावेळी सादर करण्यात आले.पालघर जिल्ह्यातील शिरगाव, ठाणे जिल्ह्यातील उत्तन, मुंबई उपनगर जिल्ह्यातील गोराई, मुंबई शहर जिल्ह्यामधील ससून गोदी, रायगड जिल्ह्यातील रेवदंडा, श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा, साखरी नाटे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या नऊ समुद्रकिनाऱ्यावरून ९ ड्रोन उडवले गेली. यावेळी मत्स्य व्यवसाय सहायक आयुक्त दिनेश हंसराज पाटील, संबंधित विभागाचे अधिकारी/कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी मंत्री श्री. राणे दूरदृश्य प्रणालीद्वारे म्हणाले की, ड्रोन यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या ७२० किलोमिटर लांबीच्या सागरी किनाऱ्यावरून राज्याच्या १२ मैल सागरी हद्दीपर्यंत बेकायदा मासेमारी करणाऱ्या अवैध नौकांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे.

# स्वामी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने अभय बापट यांचे व्याख्यान

■ शुक्रवार, १० जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता. स्थळ - कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह, महापालिका मुख्यालय
■ ठाणे महानगरपालिकेची 'विचारमंथन व्याख्यानमाला'



**ठाणे (राकेश गायकवाड) :** थोर भारतीय तत्वज्ञ, संन्यासी, द्रष्टे महापुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने शुक्रवार, १० जानेवारी रोजी ठाणे महापालिकेच्या 'विचारमंथन व्याख्यानमाले'त 'स्वामी विवेकानंद जीवन व संदेश' या विषयावर विवेकानंद केंद्राचे महाराष्ट्र आणि गोवा प्रांत प्रमुख अभय बापट यांचे व्याख्यान होणार आहे.

हे व्याख्यान दुपारी ४ वाजता ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे होणार आहे. ते सगळ्यांसाठी खुले आहे. व्याख्यानमालेचे हे चौदावे पुष्प आहे.

बुद्धी व श्रद्धा, विचार आणि भावना, सामर्थ्य आणि करुणा, ऐहिक व आध्यात्मिक यांचा उत्कृष्ट समन्वय विवेकानंदांनी घातला. भारताच्या आधुनिक युगाशी मेळ घालणारे व भविष्यातील समन्वयशील मानव संस्कृतीची दिशा दाखवणारे श्रेष्ठ तत्वज्ञ अशी त्यांची ओळख आहे.

**वक्ते – अभय बापट**

स्वामी विवेकानंद यांच्या जीवन व संदेशाविषयी श्रोत्यांचे प्रबोधन व्हावे यासाठी अभ्यासक अभय बापट यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अभय बापट हे विवेकानंद केंद्राच्या महाराष्ट्र आणि गोवा प्रांताचे प्रमुख आहेत. तसेच, केंद्रीय व्यवस्थापन समितीचे सदस्यही आहेत. ते १९९१-१९९३ या काळात विवेकानंद भारत परिक्रमेत पूर्ण कालीन कार्यकर्ता होते. ते व्यवसायाने उद्योजक आहेत.

**विचारमंथन व्याख्यानमाला**

ठाणे महापालिकेच्या वतीने महनीय व्यक्तींच्या जयंती तसेच पुण्यतिथीला त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले जाते. त्याचबरोबरीने, ज्या महनीय व्यक्तींचे स्मरण केले जाते, त्यांचे कार्य व माहिती कळावी, त्यांच्या विचारांचा जागर व्हावा यासाठी 'विचारमंथन व्याख्यानमाले'त मान्यवर व्यक्तींचे व्याख्यान आयोजित केले जाते. या व्याख्यानमालेतील हे चौदावे पुष्प असून ठाणेकरांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

# ठाणे अंतर्गत मेट्रोच्या त्रिपक्षीय सामंजस्य करारास मान्यता;
## केंद्र, राज्य शासन आणि महामेट्रो यांच्यात होणार करार

**ठाणे (विशाल कारंडे) :** ठाणेकरांना सार्वजनिक वाहतूकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी ठाणे महापालिकेने आखलेल्या १२ हजार २०० कोटींच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्पासाठी त्रिपक्षीय करार करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. यानुसार, या प्रकल्पाच्या उभारणीसाठी केंद्र, राज्य शासन आणि महामेट्रो यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार होणार आहे. यामुळे या प्रकल्पाच्या उभारणीतील एक महत्वाचे पाऊल पुढे पडले आहे.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत वडाळा-घाटकोपर ते गायमुख या मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू आहे. कापुरबावडी येथून भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. याशिवाय, ठाणेकरांना सार्वजनिक वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी ठाणे महापालिकेने अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारणीचा निर्णय होता. ठाणे शहरातून जाणाऱ्या दोन्ही मुख्य मेट्रो मार्गांना पुरक ठरेल असा अंतर्गत मेट्रोचा आराखडा महापालिकेने महामेट्रोच्या (महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड) मदतीने तयार केला होता. हा प्रकल्प ठाणे महापालिकेने राज्य शासनाची मंजुरी घेऊन केंद्र शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविला होता. १२ हजार २०० कोटींच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्पाच्या वित्तीय आराखड्यासह प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने ४ सप्टेंबर २०१४ रोजी मान्यता दिली. यामुळे प्रकल्प उभारणीचा मार्ग मोकळा



होताच या प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरू करण्यासाठी राज्य शासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून केंद्र शासनाच्या सुचनेनुसार, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र, राज्य आणि महामेट्रो यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार करावा लागणार असून त्यासाठी महामेट्रोने कराराचा मसुदाही तयार करून तो शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला होता. त्यास राज्य शासनाने नुकतीच मान्यता देऊन त्यासंबंधीच्या अध्यादेश काढला आहे.

त्रिपक्षीय सामंजस्य करारनाम्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनावर वाढणारा संभाव्य वित्तीय भार महामेट्रोने प्रकल्पाच्या अनुषंगाने स्थानिक प्राधिकरण, शासकीय, निमशासकीय संस्था यांच्याकडील जमीनी (डिपीआरमध्ये दर्शविलेल्या जमिनीव्यतिरिक्त) उपलब्ध करून घेऊन अशा जमिनींचे विकसन करून टिओडी, एफएमआय आणि इतर अनुषंगीक माध्यमातून निर्माण होणाऱ्या आर्थिक स्त्रोतांमधून भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्प अहवालामध्ये दर्शविलेल्या बाबींशिवाय अधिकचा खर्च करावयाचा असल्यास त्यास राज्य शासनाची मान्यता राहील, अशी अट घालण्यात आली आहे. राज्य शासनावर वित्तीय भार वाढल्यास त्याची प्रतिपुर्ती राज्य शासन आणि महामेट्रोकडील समर्पित नागरी परिवहन निधी मधून करण्यास मान्यता देण्यात आली आहे.


एकूण २९ किमी लांबीच्या या प्रकल्पात २६ किमी लांबीचा मार्ग हा उन्नत असून ३ किमीचा मार्ग हा भूमिगत आहे. प्रकल्पांर्गत एकूण २२ स्थानके असून त्यातील दोन स्थानके भूमिगत असणार आहेत. त्यातील एक भूमिगत स्थानक ठाणे रेल्वे स्थानकाला जोडले जाणार आहे. अन्य स्थानके शहरातील मेट्रो कॉरिडॉरला जोडली जाणार आहेत. अंदाजे ७. ६१ लाख प्रवाशांना दररोज या मेट्रो रेल्वे सेवेचा लाभ होणार आहे. ठाण्यातील नौपाडा, वागळे इस्टेट, डोंगरीपाडा, हिरानंदानी इस्टेट, कोलशेत, साकेत आदी भाग या मेट्रो रेल्वे सेवेने जोडला जाणार आहे. २०२९ पर्यंत मेट्रोची सुरुवात होईल. सहा डब्यांच्या मेट्रोवर अखेर केंद्र सरकारने शिक्कामोर्तब केल्याने गेले अनेक वर्षे कागदावर असलेला हा बहुचर्चित प्रकल्प मार्गी लागला आहे.

# मृणाल ठाकूरनं आदिनाथ कोठारे या मराठमोळ्या अभिनेत्याचं केलं कौतुक



अभिनेत्री मृणाल ठाकूर आज बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री आहे. मृणालने बॉलीवूडसह, दाक्षिणात्य सिनेमांत काम केले आहे. मृणालने विविध भाषेतील सिनेमांत काम केले असले तरी ती मराठमोळेपण नेहमी जपते. अनेकदा ती मराठीत रील आणि मजेशीर व्हिडीओ तयार करून त्या तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट करते. इन्स्टाग्रामवर 'आस्क मी एनिथिंग' सेशनमध्ये चाहत्यांच्या प्रश्नांना मराठीत उत्तर देणारी मृणाल अनेक मराठी कलाकृती आणि मराठी अभिनेत्यांचे कौतुक करत असते. नुकतेच मृणालने आदिनाथ कोठारेच्या सिनेमाचे कौतुक केले आहे. गेल्या वर्षी आदिनाथ कोठारेचा 'पाणी' हा सिनेमा आला होता. आदिनाथ कोठारेने या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. मराठवाड्यातील नागदरवाडी गावात असणारी पाणीटंचाई घालवण्यासाठी काम करणाऱ्या हनुमंत केंद्रे यांच्यावर हा सिनेमा तयार करण्यात आला आहे. या सिनेमात आदिनाथ कोठारेने हनुमंत केंद्रे यांची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. मृणालने नुकताच हा सिनेमा पाहिला असून तिने आदिनाथ कोठारेसह या सिनेमातील ऋचा वैद्य, सुबोध भावे यांसह संपूर्ण टीमचे कौतूक केले आहे, मृणाल इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करत म्हणाली, "आदिनाथ तू पाणी सिनेमात खूप छान काम केलं आहेस, एक अभिनेता आणि दिग्दर्शक म्हणून तू उत्तम काम केलं आहेस. राष्ट्रीय पुरस्कारासाठी तुम्ही खरंच पात्र आहात, प्रियांका चोप्रा, तुझी कथा सांगण्याची आवड, समाजावर चांगला परिणाम करतील अशा सिनेमांची निर्मिती करण्यासाठी मला तुझं नेहमीच कौतुक वाटतं. ऋचा वैद्य, सुबोध भावे आणि संपूर्ण 'पाणी' चित्रपटाच्या टीमचं हार्दिक अभिनंदन!" मृणालने पाणी चित्रपटाच्या टीमचं कौतुक करतानाच हा चित्रपट प्रेक्षकांनी ओटीटी माध्यमावर नक्की पाहावा असे आवाहन केले आहे. आदिनाथ कोठारेने मृणाल ठाकूरची स्टोरी रिपोस्ट करत तिचे "धन्यवाद" म्हणत तिचे आभार मानले आहे. अभिनेत्री ऋचा वैद्यनेही मृणालची स्टोरी रिपोस्ट करत तिचे आभार मानले आहे. अभिनेत्री मृणाल ठाकूर लवकरच 'सन ऑफ सरदार २' मध्ये दिसणार असून यात तिच्यासह अभिनेता अजय देवगण मुख्य भूमिकेत आहे.

# एकही सिनेमा न करता बिपाशा कमावतेय कोट्यवधी रुपये



बॉलिवूडची बिल्लो रानी आणि बंगाली ब्यूटी म्हणून अभिनेत्री बिपाशा बासूने इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिने आपल्या फिल्मी करियरमध्ये अनेक सुपरहिट सिनेमे दिले. आयटम साँगमुळेही बिपाशा चर्चेत आली होती. पण आता एकही सिनेमा न करता बिपाशा कशी कमावते आणि तिची संपत्ती किती पाहुयात.

बिपाशाने वयाच्या १७ व्या वर्षी मॉडेलिंग करिअरला सुरुवात केली. तसंच तिने अनेक चित्रपट केले ज्यामध्ये तिच्या भूमिकेचे खूप कौतुक झाले. पण लहानपणी तिला कोणीही पसंत करत नव्हते कारण ती खूप सावळी आणि लठ्ठ होती. परिस्थिती अशी होती की कॉलेजमध्येही तिचे मित्र तिला तिच्या काळ्या रंगावरुन चिडवायचे.

गेल्या ८ ते ९ वर्षांपासून बिपाशा फिल्म इंडस्ट्रीपासून दूर आहे, पण तरीही ती कोट्यवधींची कमाई करते. एकेकाळी अभिनेत्रीची तिच्या पतीपेक्षाही जास्त तिची संपत्ती होती. बिपाशा ही मलायका अरोरा आणि सुजैन खानसह "द लेबल लाइफ" नावाचा क्लोदिंग ब्रँड चालवते. रिपब्लिक वर्ल्डच्या रिपोर्टनुसार, बिपाशा जवळपास १२४ कोटींच्या संपत्तीची मालकीण आहे. बिपाशाचा मुंबईतील वांद्रात एक अलिशान बंगला असून त्याची किंमत १६ कोटींच्या जवळपास आहे. सोबतच तिला लक्झरियस, महागड्या गाड्यांचीही आवड आहे.

बिपाशाने २००१ मध्ये 'अजनबी' या थ्रिलर चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटासाठी तिला सर्वोत्कृष्ट महिला पदार्पणाचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. यानंतर तिने सुपरहिट हॉरर फिल्म 'राज' मध्ये काम केले. हा चित्रपट तिच्या करिअरमधील टर्निंग पॉइंट ठरला. यानंतर बिपाशाने एकाच जॉनरचे अनेक चित्रपट केले.

बिपाशाने एका पोस्टमध्ये सांगितले होते की, 'जेव्हा सुपरमॉडेल स्पर्धा जिंकली होती. प्रत्येक पेपरमध्ये बातमी छापून आली की कोलकात्यातील एक सावळी मुलगी विजेती ठरली. माझे टॅलेंट कोणी पाहिली नाही. माझ्या घरातही माझ्या काळ्या रंगाची चर्चा होती. माझ्या रंगामुळे मी इतर अभिनेत्रींपेक्षा वेगळी मानली जात होती. या काळात, मला अनेक स्किन केअर एंडोर्समेंट ऑफर मिळाल्या पण मी त्या नेहमी नाकारल्या.

# "प्रिय रसिक-मायबाप, मराठी चित्रपटसृष्टीला...", 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम प्रसाद खांडेकरची प्रेक्षकांना भावनिक साद



मराठी सिनेविश्वातील बरेच कलाकार सध्या 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटाच्या निमित्ताने पत्र लिहून व्यक्त होत आहेत. काही दिवसांपूर्वी अभिनेत्री पूजा सावंतने देवाला पत्र लिहून आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. या पत्राद्वारे तिने मुक्या प्राण्यांविषयीचं आपलं मत मांडलं होतं. आता पूजा सावंत पाठोपाठ 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम लेखक, दिग्दर्शक व अभिनेता प्रसाद खांडेकरने खास पत्र लिहिलं आहे. प्रसाद खांडेकरने हे पत्र रसिक मायबाप प्रेक्षकांना उद्देशून लिहिलं आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रेक्षक थिएटरपर्यंत येत नाहीत. मराठी चित्रपटांना स्क्रीन्स मिळत नाही अशा चर्चा आहेत. याच पार्श्वभूमीवर पत्र लिहित अभिनेत्याने प्रेक्षकांना भावनिक साद घातली आहे.प्रसाद खांडेकर पत्र लिहित म्हणतो, "नमस्कार मी प्रसाद खांडेकर... सध्या मी बघतोय की, आमचे बरेच कलाकारमंडळी पत्र लिहित आहे म्हणूनच विचार केला आपणही पत्र लिहून व्यक्त व्हावं. आज मी काही व्यक्तींना पत्र लिहिणार आहे. प्रिय रसिक मायबाप, तुम्ही आहात म्हणून आम्ही आहोत. तुम्हीच डोक्यावर घेता आणि प्रसंगी आमचे कानही पकडता. मराठी चित्रपटसृष्टीला आणि नाट्यसृष्टीला तुमची गरज आहे. तुम्ही थिएटरमध्ये आलात तर, आम्हाला बळ मिळेल आणि मनोरंजनसृष्टीचे सोन्याचे दिवस परत येतील.

# प्रसिद्ध निर्माते प्रीतीश नंदी यांचे निधन, करीना कपूरसह 'या' बॉलीवूड सेलिब्रिटींनी वाहिली श्रद्धांजली



चित्रपट निर्माता, पत्रकार आणि कवी प्रीतीश नंदी यांचे बुधवारी (८ जानेवारी २०२४) निधन झाले. प्रीतीश नंदी हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते, त्यांनी पत्रकारिता, काव्य, आणि भारतीय चित्रपटसृष्टीत मोलाचे योगदान दिले. अनेक बॉलीवूड सेलिब्रिटींनी त्यांना सोशल मीडियावर श्रद्धांजली अर्पण केली. करीना कपूरने, दिग्दर्शक सुधीर मिश्रा यांच्या २००४ सालच्या 'चमेली' या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली होती, या चित्रपटाची निर्मिती प्रीतीश नंदी आणि त्यांच्या कन्या रंगिता यांच्या 'प्रीतीश नंदी कम्युनिकेशन्स' प्रोडक्शन हाऊस अंतर्गत करण्यात आली होती. करीना कपूरने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून स्टोरी शेअर करत 'चमेली' चित्रपटाच्या सेटवरील काही फोटो शेअर केले. एका फोटोमध्ये ती शॉट्सच्या दरम्यान प्रितीश नंदींबरोबर हसत-गप्पा मारताना दिसली. करीना कपूरने त्या फोटोंसह (हात जोडलेले इमोजी) वापरत पोस्ट केली. 'चमेली'चे दिग्दर्शक सुधीर मिश्रा यांनीदेखील त्यांच्या X हँडलवर प्रीतीश नंदी यांना श्रद्धांजली अर्पण केली. प्रीतीश नंदी यांनी सुधीर मिश्रा दिग्दर्शित २००३ सालचा 'हजारों ख्वाहिशें ऐसी' या चित्रपटाची निर्मिती केली होती. "प्रीतीश नंदी यांनी माझे आयुष्य बदलले. त्यांनी मला खूप काही शिकवले. माफ करा प्रीतीश नंदी , मी या चित्रपटाच्या सिक्वेलसाठी कोणतीही कल्पना सादर करू शकलो नाही," असे सुधीर मिश्रा यांनी लिहिले. दत्तने संजय गुप्ता यांच्या २००२ सालच्या 'कांटे' या ॲक्शन थ्रिलर चित्रपटात आणि लीना यादव यांच्या २००५ सालच्या 'शब्द' या सिनेमात भूमिका साकारली होती, या दोन्ही चित्रपटांची निर्मिती प्रीतीश नंदी यांनी केली होती. संजय दत्तने त्याच्या X हॅण्डलवरून प्रीतीश नंदी यांना श्रद्धांजली वाहिली. त्याने प्रीतीश नंदी यांचा फोटो शेअर करत लिहिले, "एक खरा सर्जनशील प्रतिभावंत आणि दयाळू व्यक्ती, तुमची खूप उणीव भासेल सर.

# बेबी जॉन ठरला फ्लॉप, वरुण धवन थेट डिप्रेशनमध्ये! राजपाल यादवनं दिली महत्त्वाची माहिती!




बॉलिवुडचा प्रसिद्ध अभिनेता वरुण धवनचा नुकताच बेबी जॉन हा चित्रपट प्रदर्शित झाला. मात्र पुष्पा-२ च्या वादळात या चित्रपटाची धुळधाण उडाली. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर पुरता आपटला आहे. दरम्यान, हा चित्रपट फ्लॉप ठरल्यानंतर त्यामध्ये भूमिका करणाऱ्या राजपाल यादवने वरुण धवनबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. सध्या वरुण धवन डिप्रेशनमध्ये आहे का? या प्रश्नाचं उत्तर देताना राजपाल यादव यांनी बरंच काही सांगितलं आहे.

वरुण धवन प्रमुख भूमिकेत असलेल्या बेबी जॉन या चित्रपटात अनेक दिग्गज कलाकारांनी भूमिका केलेली आह कीर्ति सुरेश, जॉकी श्रॉफ, वामिका गब्बी आदी बडे कलाकार या चित्रपटात आहेत. तरीदेखील हा चित्रपट लोकांना आवडलेला नाही. याच चित्रपटावर राजपाल यादव यांनी भाष्य केलं आहे. राजपाल यादव यांना बेबी जॉन हा चित्रपट फ्लॉप का झाला आहे, त्यामुळे वरुण धवन डिप्रेशनमध्ये आहे का? असे विचारण्यात आले. या प्रश्नाचे उत्तर देताना वरुण धवन डिप्रेशनमध्ये नाही. तो खूप छान कलाकार आहे. खूप मेहनती आहे. तो नेहमी काहीतरी वेगळं करण्याच्या प्रयत्नात असतो. त्याच्या या प्रयत्नांचं कौतुक केलं पाहिजे. कारण आजकाल जोखीम पत्करणं फार मोठी बाब आहे, असं राजपाल यादवने सांगितलं.

बेबी जॉन हा चित्रपट Theri या चित्रपटाचा रिमेक आहे. बेबी जॉन हा चित्रपट Theri चित्रपटाचा रिमेक नसता तर वरुण धवनच्या २५ वर्षांच्या करिअरमधील हा सर्वोत्तम चित्रपट असता. मात्र थलापती विजयने हा चित्रपट याआधीच केलेला आहे. प्रेक्षक हा चित्रपट अगोदरच पाहून बसलेले आहेत. बेबी जॉन हा चित्रपट रिमेक असल्यामुळे त्याचा परिणाम बॉक्स ऑफिसवर झाला. या चित्रपटात राजपाल यादवने पोलीस कॉन्स्टेबल रामसेवकची भूमिका साकारलेली आहे.

दरम्यान, राजपाल यादवे हे एक चांगले मुरलेले कलाकार आहेत. २०२४ साली त्यांचा भूलभलैया-३ हा चित्रपट आला होता. या चित्रपटात कार्तिक आर्यन, विद्या बालन, माधुरी दीक्षित आदी स्टार्स होते. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली.

# थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव रंगणार मुंबईत




आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये गाजलेला आणि कान महोत्सवात अ-सर्टन रिगार्ड विभागात सर्वोत्तम ठरलेला 'ब्लॅक डॉग' या चायनीज चित्रपटाने २१ व्या थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र फिल्म स्टेज अँड कल्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी चित्रपट क्षेत्रातील अव्दितीय योगदानाबद्दल 'एशियन कल्चर' या विशेष पुरस्काराने सुप्रसिद्ध पटकथा लेखक आणि गीतकार जावेद अख्तर यांना गौरविण्यात येणार आहे.अंधेरीच्या मुव्ही मॅक्स चित्रपटगृहात महोत्सवाचा शुभारंभ १० जानेवारीला सायं ६.३० वा. होणार आहे.'२१ वा थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव' १० ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत मुंबई आणि ठाणे येथे रंगणार आहे.

थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सवाच्या २१ व्या आवृत्तीमध्ये आशियाई स्पेक्ट्रम विभागात चीन, भूतान, नेपाळ, बांगलादेश, मलेशिया, कझाकिस्तान, ट्यूनिशिया, जपान, इराण, साउथ कोरिया आणि श्रीलंका या देशातील चित्रपटांचा समावेश आहे आणि साउथ कोरियामधील सहा चित्रपट कंट्री फोकस विभागात दाखवले जातील.

# दोन देश, दोघांचं करिअरही वेगळं...; मराठी अभिनेत्याने गर्लफ्रेंडला गोव्यात घातली लग्नाची मागणी



'मुलगी झाली हो', 'फ्रेशर्स', 'राणी मी होणार' या मालिकांमधून अभिनेता सिद्धार्थ खिरीड घराघरांत लोकप्रिय झाला. सध्या अभिनेता त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर फोटो शेअर करत सिद्धार्थने आपल्या प्रेमाची जाहीर कबुली दिली होती. याबरोबर त्याने गर्लफ्रेंडसह रोमँटिक फोटो देखील शेअर केले होते. चाहत्यांना नवीन वर्षात ही आनंदाची बातमी दिल्यावर आता सिद्धार्थने त्याच्या ड्रीम प्रपोजलचा व्हिडीओ सुद्धा शेअर केला आहे.

"दोन हृदय, दोन देश, दोन प्रोफेशन्स आणि त्यांची एक प्रेमकहाणी..." असं कॅप्शन देत अभिनेत्याने प्रेमाची कबुली दिली होती. सिद्धार्थ खिरीड सौंदर्यवती डॉ. मैथिली भोसेकरच्या प्रेमात आहे. गेल्या दोन वर्षांपासून हे दोघं एकमेकांना ओळखतात. मैथिली कॅनडात असते. तिने फ्लोरीडा इथे पार पडलेल्या सौंदर्य स्पर्धेत 'मिस इंटरनॅशनल वर्ल्ड पेटिट २०२२-२०२३' हा खिताब पटकावला होता. भारतात आल्यावर ती सिद्धार्थच्या मालिकेचं शूट पाहायला गेली होती आणि इथेच यांची भेट झाली होती.

सिद्धार्थ खिरीडने मैथिलीला गोव्यात लग्नाची मागणी घातली आहे. यासाठी त्याने जय्यत तयारी केली होती. मैथिलीला सरप्राइज देण्यासाठी त्याने सुंदर प्लॅनिंग केलं होतं. यावेळी त्याने बॉलीवूड गाण्यांवर डान्स करत, आपल्या गर्लफ्रेंडला गोड सरप्राइज दिलं आणि त्यानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या.

अभिनेता गर्लफ्रेंडला प्रपोज करताना म्हणतो, "२२ एप्रिल २०२२...सगळं 'टू टू टू' आहे आणि आता माझ्या आयुष्यात फक्त तूच आहेस. खूप दिवसांपासून तुला प्रपोज करावं असं वाटत होतं. आता खूप हिंमत करून बोलतोय... तुझी यात काहीच चूक नाहीये. कारण, तुला बघितल्यावर लगेच मी प्रपोज केलं पाहिजे होतं. पण, माझी हिंमत होत नव्हती. आता आज सगळं जुळून आलंय... खूपच गोड आहे माझी मैथिली. सगळ्यांना अशी गर्लफ्रेंड... जी आता माझी बायको होईल अशी मुलगी मिळत नाही. फारशा तिच्या अपेक्षा नाहीयेत. वडापाव, मिसळपाव, पावभाजी हे पदार्थ दिले तरी ती खूश होऊन जाते. मैथिली पण एवढंच नाहीतर मला ज्या गोष्टी शक्य आहेत त्या सगळ्या मी तुला देण्याचा प्रयत्न करणार आहे. माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे मैथिली...आय लव्ह यू बेबी." यावर मैथिली म्हणाली, "मी जेव्हा तुला पहिल्यांदा पाहिलं तेव्हाच मी तुझ्या प्रेमात पडले होते. त्यानंतर आपण जो काही वेळ एकत्र घालवला तो मॅजिकल होता.




**मेष** – जोडीदारासोबत वेळ घालवाल. तुमच्या कामाची प्रशंसा होईल. शक्य असल्यास वाद टाळा. कार्याला योग्य दिशा मिळेल.

**वृषभ** – नवीन ओळखीचा उपयोग होईल. रचनात्मक आणि कलात्मक शक्तीला चालना मिळेल. तक्रारीला वाव देऊ नका.

**मिथुन** – मौजमजेसाठी पैसे खर्च होण्याची शक्यता आहे. काहीतरी नवनिर्मिती कराल. वाद-विवादात पडू नका. घरगुती कामे होतील.

**कर्क** – नोकरीत कामाचा आळस करू नका. आपले वरिष्ठ प्रसन्न होतील. बोलण्यामुळे गैरसमज होणार नाहीत याचे भान ठेवा.

**सिंह** – प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. मानसिक, शारीरिक परिश्रम अधिक होतील. वाहन जपून चालवा. धंद्यात काम मिळेल.

**कन्या** – नवा परिचय होईल. आरोग्य उत्तम राहील. प्रतिस्पर्ध्यांसोबत एखाद्या गहन चर्चेत सहभागी होऊ नका. खरेदी कराल.

**तूळ** - अधिक खर्च होणार नाही याचे भान ठेवा. जुनी येणी वसूल होतील. आरोग्य जपा. महत्त्वाचे काम करण्यात आळस करू नका.

**वृश्चिक** – कोर्टाच्या कामाला दिशा मिळेल. नातेवाईकांसोबत वादाचे प्रसंग येतील. वैचारिक दृढतेमुळे कामे चांगल्या रीतीने पूर्ण कराल.

**धनु** – रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. मैत्रीत वाढ होईल. वरिष्ठांपासून सांभाळून राहा. गृहस्थ जीवनाचा पूर्ण आनंद घ्याल.

**मकर** – नोकरीत आपले वर्चस्व राहील. घरात क्षुल्लक कारणावरून तणाव होईल. आर्थिक बाबतीत व्यवस्थित योजना तयार कराल.

**कुंभ** – धंद्यातील चर्चा यशस्वी होईल. आपण ठरवलेले काम पूर्ण करता येईल. मुलांची चिंता सतावेल. मान-सन्मान मिळेल.

**मीन** – वरिष्ठांच्या सहकार्यानेच वागावे लागेल. अधिक परिश्रमाची कामे टाळा. मानसिक शांतता लाभेल. प्रवासाचे नियोजन कराल.

# पीठ कंपन्यांना जाणवतोय गव्हाचा तुटवडा



मुंबई (विशाल कारंडे) : गव्हाचा हंगाम अखेरच्या टप्प्यात असल्यामुळे दीड- दोन महिन्यांपासून देशातील मोठ्या पीठ उत्पादक कंपन्यांना (मिल्स) गव्हाचा तुटवडा जाणवत आहे. प्रति किलो सरासरी तीन ते चार रुपये जास्त मोजून मिल दर्जाचा गहू खरेदी करावा लागत आहे. त्यामुळे तयार पिठाच्या दरातही प्रति किलो सरासरी दोन रुपयांनी वाढ झाली आहे.

देशातील गव्हाचा हंगाम अखेरच्या टप्प्यात आहे. नवीन गहू फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून बाजारात येण्यास सुरुवात होईल. शिवाय केंद्र सरकारने भारतीय अन्न महामंडळाकडील फारसा गहू बाजारात आणला नाही. त्यामुळे देशातील मोठ्या पिठाच्या गिरण्यांना अथवा तयार गव्हाचे पीठ विक्री करणाऱ्या कंपन्यांना मिल दर्जाच्या (हलका ते मध्यम दर्जा) गव्हाची टंचाई जाणवत आहे.

देशातील अनेक पिठाच्या गिरण्यांना गरजेपेक्षा कमी दर मिळत आहे. त्यामुळे दैनदिन पीठ उत्पादनावर परिणाम दिसून येत आहे. गरजेच्या तुलनेत ७० ते ८० टक्के गव्हू उपलब्ध होत आहे. त्यामुळे पिठाच्या गिरण्यांना २८ ते ३० रुपयांनी मिळणारा गव्हू सध्या ३३ ते ३४ रुपयांनी खरेदी करावा लागत आहे. अनेक गिरण्या, कंपन्या दरवाढ टाळण्यासाठी लोकवन सारख्या मध्यम दर्जाच्या आणि नियमित वापरात असणाऱ्या गव्हात मालवराज (लापशी साठीचा गहू) सारख्या कमी दर्जाच्या गव्हाचे मिश्रण करीत आहेत. तर काही गिरण्यांनी पिठाच्या किंमतीत वाढ केली आहे.

देशभरात गव्हाचा तुटवडा नाही. आजही मुबलक प्रमाणात गहू उपलब्ध आहे. गिरण्यांना मिल दर्जाचा म्हणजे मध्यम दर्जाचा गहू लागतो. २८ ते ३० रुपयांनी मिळणार गहू सध्या ३३ ते ३४ रुपयांनी खरेदी करावा लागत आहे. बाजारात गव्हाचे दर ३३ ते ३६ रुपये प्रति किलोंवर स्थिर आहेत. त्यामुळे केंद्र सरकारकडून तातडीने हस्तक्षेप होण्याची शक्यता नाही, अशी माहिती गव्हाचे व्यापारी राजेश शहा यांनी दिली.

## फेब्रुवारी अखेरपर्यंत दरवाढ ?

यंदा देशभरात डिसेंबरअखेर ३१९.७४ लाख हेक्टर क्षेत्रावर गव्हाची पेरणी झाली आहे. सरासरीच्या तुलनेत सात लाख हेक्टरने लागवडीत वाढ झाली आहे. चांगल्या पावसाळ्यामुळे पाण्याची उपलब्धता चांगली आहे. थंडीही चांगली आहे. त्यामुळे यंदा विक्रमी गहू उत्पादनाचा अंदाज आहे. पण, नवा गहू बाजारात येण्यासाठी फेब्रुवारी महिन्याचा दुसरा आठवडा उजाडणार आहे. त्यामुळे फेब्रुवारीअखेरपर्यंत गिरण्यांना वाढीव दराने गहू खरेदी करावा लागणार आहे. दरम्यानच्या काळात केंद्र सरकारने अन्न महामंडळाच्या साठ्यातील गव्हाची खुल्या बाजारात अथवा गिरण्यांना विक्री केल्यास काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो, अशी माहिती गव्हाचे व्यापारी सचिन रायसोनी यांनी दिली.

# वावोशी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद



वावोशी (फरीद डावरे) :- विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल, वावोशी येथे विज्ञानाच्या अद्भुत जादूचा अनुभव देणारे विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात ज्युनिअर केजी ते १० वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित १०० हून अधिक प्रतिकृती सादर केल्या. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित असलेले जेएसडब्ल्यू कोटेड स्टील लि. कंपनीचे मुख्याधिकारी राहुल महाकाल आणि जनरल मॅनेजर अनिल महाजन यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रदर्शन यशस्वीरीत्या पार पडले. विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करताना विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करून भविष्यातील शास्त्रज्ञ तयार करणे हा उद्देश होता. पाणी, हवा, भौगोलिक बदल, ऊर्जा बचत, प्रदूषण नियंत्रण यांसारख्या विषयांवर आधारित विद्यार्थ्यांनी आकर्षक व ज्ञानवर्धक प्रतिकृती सादर केल्या. प्रदर्शनातील सर्व प्रतिकृतींचे परीक्षण करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व चषक देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

SPORT

## 'Takes 5-6 balls to pick visual cues on Bumrah. You could be out by then': Steve Smith's insight into facing India pacer



**NEW DELHI :**Team India may have lost the Border-Gavaskar Trophy 1-3, but Jasprit Bumrah's performances throughout the series were one of the side's big positives. The fast bowler was named Player of the Series for his fiery spells, although missing the final day of the Test match due to injury will likely sting him for a while.

On what he called the "spiciest" pitch of the series, Bumrah was forced off the field after suffering a back spasm on Day 2. His absence in the second innings left India without their premier pacer as they attempted to defend a 162-run target, which Australia chased down with six wickets remaining.

Ricky Ponting, the former Australian captain, shed light on Bumrah's impact throughout the series, sharing a revealing conversation with star batter Steve Smith. Smith, known for his meticulous technique against fast bowlers, admitted that Bumrah was "harder to pick" than most bowlers worldwide, noting that the Indian pacer doesn't give batters the luxury of settling into their innings.

"I had a chance to talk to Aussies on what makes it so difficult. I've been seeing him for a long time, I captained him in IPL when he first came into the scene as a 17-year-old. I talked to Steve Smith, who has a good method of working fast bowlers out. He said that he finds Bumrah's visual cues a bit hard to pick up than the most, and that it can take take you four, five, or six balls," Ponting told 7Cricket. "Sometimes, you could be out by then. If you didn't get things right by that stage when you're facing Bumrah on a challenging surface, your game could be over pretty quickly." Bumrah ended the Test series with 32 wickets to his name, the highest by an Indian pacer in a series Down Under. The true extent of Bumrah's injury is unknown, and it is likely that the Indian pacer will remain away from action throughout January. India host England for three ODIs and as many T20Is this month, and Bumrah is likely to skip the bilateral series.

# Rohit Sharma shouldn't play Tests anymore, he made wrong call in Sydney: Mohammad Kaif

**NEW DELHI :** Former India batter Mohammad Kaif criticised Rohit Sharma's decision to step away from the fifth and final Test of the Border-Gavaskar Trophy in Australia, arguing that Rohit should have led the team in the must-win match in Sydney instead of citing poor form and sitting out. Kaif insisted that as captain, Rohit had a responsibility to lead from the front.

Rohit Sharma faced scrutiny for his poor form with the bat during the 2024-25 season. His struggles continued in Australia, where he managed just 31 runs across three Tests before dropping himself for the series decider. While some pundits and former players, including Irfan Pathan, praised Rohit for taking a "selfless" and pragmatic call, Kaif strongly disagreed, stating that the captain should have stood by his team in such a crucial match.

Border-Gavaskar Trophy: Full Coverage

India entered the Sydney Test trailing 1-2 in the series, needing at least a draw to retain the Border-Gavaskar Trophy. Instead, they lost the final Test by six wickets, surrendering the trophy for the first time in seven years. Rohit's absence as a leader was magnified when stand-in captain Jasprit Bumrah suffered a back injury in the first innings and was unavailable to bowl or captain on Days 2 and 3. Former skipper Virat Kohli took over the reins on the field, but without Bumrah's impact with the ball, India failed to defend a target of 162 on a seam-friendly pitch.



"I think Rohit should no longer play in Tests because he was needed the most in the Sydney Test match. I had said he should have played -- it would've been the right call," Kaif remarked on his YouTube show.

"He should have played, even if he wasn't scoring runs. Nobody was scoring runsâ not Kohli, not Khawaja, not Labuschagne. Smith found form late in the series. There were no high-scoring matches. Everyone struggled. KL Rahul scored in the beginning but failed later, scoring either a century or a duck. As a leader, that was Rohit Sharma's moment to stand by his team and be out there."

Kaif also underlined the importance of Rohit's leadership and how his absence impacted the team during Bumrah's injury.

"His absence was felt when Bumrah got injured in the second innings. Rohit Sharma, as a captain, would've been there. He has been with the team for two years and knows the playersâ Siraj, Jadeja, Prasidh Krishna, and Akash Deep. Rohit was familiar with everyone's roles. But at that crucial moment, there was no oneâ not Bumrah, not Rohit," he said.

Kaif criticised the leadership dynamics during the Sydney Test, noting that Kohli, who hadn't captained the team in recent years, was suddenly thrust into the role.

"The one who [Kohli] hadn't been leading the team for years was suddenly in charge, asking Siraj and Jadeja, 'What are you going to do?' Prasidh Krishna, playing his debut match, struggled with his length under pressure. Who was supporting these young bowlers? There was no one. Rohit Sharma made the wrong decision to sit out," Kaif added.

While Rohit candidly admitted to poor form after stepping aside, he dismissed speculation about retirement..Rohit highlighted the fickle nature of form in cricket and hinted at returning to Tests in the future.

With India failing to qualify for the World Test Championship final, their next assignment in the format is a five-match series against England, starting on 20 June.



## '23 January ko dekhte hain': Sunil Gavaskar's ultimatum to Indian players

**NEW DELHI :**Dismal performance by India, particular the batters, in the recently-concluded Test series in Australia has received a lot of criticism from former players and experts, all of who believe that there is no other way to improve than going through the grind in domestic cricket, whatever be the stature or reputation of the players.India lost the Border Gavaskar Trophy 1-3 despite taking a 1-0 lead by winning the opening match of the five-Test series in Perth. But continuous poor show of the batters, including that of captain Rohit Sharma and batting legend Virat Kohli, led to three defeats in the next four matches.Rohit even had to 'step aside' for the fifth and deciding Test in Sydney, allowing Shubman Gill to replace him and Bumrah to lead the side. The skipper had scored just 31 runs in his five innings before that in the series.Kohli began the tour well, scoring 100 not out in the second innings at Perth. But his other eight innings in the series produced just 90 runs. His repeated mistakes and getting out caught behind with trouble against deliveries bowled outside his off-stump irritated batting legends like Sunil Gavaskar, who issued a sort of ultimatum to the Indian players at the end of the series.Shubman Gill scored just 93 runs in five innings and Rishabh Pant 255 runs in 9 innings. Opener Yashasvi Jaiswal was the top scorer among Indian batters with 391 runs in 10 innings. KL Rahul made 276 runs in 10 innings.Gavaskar said there should be no excuse now for the players to not play the Ranji Trophy for their respective state teams."23 January ko agla round hai Ranji Trophy ka, dekhte hain kitne log khelte hain, kitne log available hain (the next round of the Ranji Trophy begins 23rd January, let's see who all play, who all are available)," said Gavaskar on Star Sports at the end of Sydney Test last Sunday, after India's six-wicket defeat."That will tell you (who all are serious). There should be no excuse, that we can't play, this and that. If you don't play, then (head coach) Gauatam Gambhir should say 'you don't have commitment, we need commitment. You aren't playing, okay. Do whatever you want, but you can't return to the Indian Test team'," a visibly disappointed Gavaskar added.

# IPL star injects five blows in Vijay Hazare match, presents strong case for India selection ahead of Champions Trophy

**NEW DELHI :** The Vijay Hazare Trophy is underway and players have a great opportunity to present their case for India selection ahead of the ICC Champions Trophy 2025, which will be played in February-March. India will start their campaign against Bangladesh on February 20, and three days later they take on arch rivals Pakistan. Their final group stage match is against New Zealand and depending on the outcome of the three matches it will be determined if India will progress to the knockouts.

The ICC has set January 12 as the final date to submit the provisional squad for the tournament and hence it is expected that the Ajit Agarkar-led selection committee will announce the 15-member team by the end of this week. However, the participating nations are allowed to make changes to their provisional squad by February 13, a week before the tournament starts. Also Read | Hardwork and Homework: At 40, what makes Delhi Capitals new recruit Faf du Plessis the fittest While fans are eagerly waiting for the squad reveal, Kolkata Knight Riders' mystery spinner Varun Chakaravarthy has presented a strong case for selection following his haul against Rajasthan on Thursday. The 33-year-old produced a strong display and injected five



blows to help Tamil Nadu restrict Rajasthan at 267/10 in 47.3 overs at the Kotambi Stadium in Vadodara. Out of the five wickets, he cleaned up three (Mahipal Lomror, Deepak Hooda, Khaleel Ahmed) while the other two (Abhijeet Tomar, Kukna Ajay Singh) were caught. He maintained an economy of just under six runs per over and conceded 52 runs in the nine overs he bowled.

The spinner played a key role in derailing Rajasthan's momentum after they were onset towards imposing a big total on the board after being invited to bat first. It started with him breaking the 160-run stand for the second wicket between Tomar and Lomror, with the former getting out for 111(125). He then cleaned up Lomror for 60(49), and then Hooda for 7(8). Varun Chakaravarthy shines in ongoing Vijay Hazare Trophy The five-wicket haul on Thursday helped Charkvarthy's wicket tally climb to 18 from six encounters. He has so far completed two five-wicket hauls. He is currently the leading wicket-taker in the tournament, one ahead of Arshdeep Singh, who has 17 scalps from the same number of matches.Varun Chakaravarthy's return to international cricket Chakravarthy made a return to international cricket after a gap of three years, which was during the T20Is against Bangladesh last year. He finished the series as the leading wicket-taker, scalping five wickets from three matches. The spinner then scalped 12 wickets from four matches against South Africa, which included a five-wicket haul in Gqeberha. However, Chakravarthy is yet to earn his maiden ODI cap.

# उद्योगविषयक धोरणांमध्ये कालानुरूप बदल करावेत -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## उद्योग विभागाच्या १०० दिवसांच्या आराखड्याचे सादरीकरण

● मुंबई, विशाल कारंडे :

**राज्यात जास्तीत जास्त गुंतवणूक आणण्यासाठी ईज ऑफ डुइंग बिझनेसची प्रक्रिया आणखी उद्योगपूरक करावी. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील जागांचे वाटप करण्याची प्रक्रिया येत्या १०० दिवसात करावी. उद्योग विषयक धोरणांमध्ये कालानुरूप बदल करण्याची गरज असून त्यासंदर्भात तातडीने आराखडा तयार करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आज राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या आराखड्यासंदर्भात उद्योग विभागाचा आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कामगार मंत्री आकाश फुंडकर, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, इंद्रनील नाईक उपस्थित होते. उद्योग विभागाचे सचिव पी. अन्बलगन यांनी १०० दिवसात उद्योग विभागाकडून करण्यात येणाऱ्या कामासंदर्भात सादरीकरण केले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) सध्या ३ हजार ५०० एकर जमीन वाटपासाठी उपलब्ध असून नवीन १० हजार एक जमीन अधिग्रहणासाठी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ईज ऑफ डुइंग बिझनेस अंतर्गत मैत्री पोर्टल व उद्योग आयुक्तालयाचे पोर्टलवर एआय चॅटबॉट सुविधा देण्यात येणार आहे. तसेच शून्य प्रलंबितता धोरण अवलंबून मैत्री पोर्टलवर आणखी ५० सेवांचा समावेश करण्याची



प्रक्रिया येत्या १०० दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे. उद्योग धोरण, इलेक्ट्रॉनिक धोरण, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, वस्त्रोद्योग धोरण व एमएसएमई धोरण या धोरणांमध्ये कालानुरुप बदल करण्याची आवश्यकता असून यासाठी मार्चपर्यंत प्रक्रिया सुरू करावी, असेही यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले. उद्योग व निर्यातीला चालना देण्यासाठी सर्व जिल्हानिहाय गुंतवणूक व निर्यात परिषदांचे आयोजन करण्यात येणार आहे.

### बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे

- तक्रार निवारणासाठी कक्ष तयार करणार
- दावोस गुंतवणूक परिषद २०२५ मध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक आणण्यावर भर
- गुंतवणूक प्रोत्साहन अनुदानाची रक्कम तातडीने वितरित करणार
- परकीय गुंतवणूक आणण्यासाठी पावले उचणार
- ऑरिक सिटी, दिघी पोर्ट व बिडकीन औद्योगिक शहरांमधील कामे तातडीने पूर्ण करणार

### जिल्ह्यांमध्ये उद्योग सेवा केंद्रांचे बळकटीकरणावर भर

- यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते.

# देशात विकास दरात घसरण होत असताना पुण्यातील उद्योगांचे आश्वासक चित्र! एमसीसीआयएच्या सर्वेक्षणातील निष्कर्ष

● पुणे, शकील शेख :

देशाच्या विकास दरात घसरण होत असताना पुण्यातील उद्योगांमध्ये व्यवसायातील वृद्धीबाबत आशादायी चित्र आहे. पुण्यातील ८४ टक्के कंपन्यांनी वाढीबाबत सकारात्मक मत नोंदविल्याचे मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरच्या (एमसीसीआयए) मासिक सर्वेक्षणातून बुधवारी समोर आले. एमसीसीआयएकडून १०८ कंपन्यांचे जानेवारीतील मासिक सर्वेक्षण करून त्यांच्या वाढीच्या अपेक्षांबाबतचा अहवाल जाहीर करण्यात आला आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षाबाबतचा अंदाज कंपन्यांनी या अहवालात वर्तविला आहे. या अहवालानुसार, पुण्यातील ८४ टक्के कंपन्यांनी वाढीचा अंदाज व्यक्त केला आहे.



याच वेळी ११ टक्के कंपन्यांना जैसे थे स्थिती अपेक्षित असून, ५ टक्के कंपन्यांनी घट होण्याची शक्यता नोंदविली आहे.

गेल्या महिन्यातील सर्वेक्षणात ३७ टक्के कंपन्यांनी महसुलात २० टक्क्यांहून अधिक वाढीचा अंदाज व्यक्त केला होता. त्यांची संख्या या महिन्यात कमी होऊन २८ टक्क्यांवर आली आहे. याच वेळी १० ते २० टक्के वाढीचा अंदाज व्यक्त करणाऱ्या कंपन्यांची संख्या गेल्या महिन्याच्या तुलनेत २६ वरून वाढून ३२ टक्क्यांवर पोहोचली आहे. तसेच, १ ते १० टक्के वाढ अपेक्षित असलेल्या कंपन्यांची संख्याही गेल्या महिन्याच्या तुलनेत वाढून १९ वरून २४ टक्क्यांवर पोहोचली आहे.

या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या कंपन्यांमध्ये सर्व प्रकारच्या कंपन्यांचा समावेश आहे. त्यात ५ टक्के मोठ्या कंपन्या (२५० कोटी रुपयांहून अधिक महसूल), ९ टक्के मध्यम कंपन्या, ३० टक्के लघु कंपन्या आणि ५६ टक्के सूक्ष्म कंपन्या आहेत. देशातील उद्योगांच्या सध्याच्या संख्याबळानुसार या सर्वेक्षणात प्रत्येक वर्गातील कंपन्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम कंपन्यांची संख्या देशात जास्त असल्याने त्यांचे या सर्वेक्षणातील प्रतिनिधित्व जास्त आहे.

### वाढ – डिसेंबरमधील प्रतिसाद – जानेवारीतील प्रतिसाद (टक्क्यांमध्ये)

- २० हून अधिक – ३७ – २८
- १० ते २० – २६ – ३२
- १ ते १० – १९ – २४
- जैसे थे – ९ – ११
- नकारात्मक – ९ – ५

### संरक्षण, इलेक्ट्रॉनिक उत्पादन आघाडीवर

एमसीसीआयएच्या दोन महिन्यांतील मासिक सर्वेक्षणानुसार संरक्षण आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादन कंपन्या आघाडीवर असून, त्या वाढीबाबत सकारात्मक आहेत. गेल्या महिन्यातील सर्वेक्षणाच्या तुलनेत सकारात्मक असलेल्या कंपन्यांची संख्या ८१ वरून ८४ टक्क्यांवर पोहोचली आहे. याच वेळी वाढीबाबत नकारात्मक असलेल्या कंपन्यांची संख्या ९ वरून ५ टक्क्यांवर आली आहे.

# नाशिक महानगरपालिकेच्या दोन रुग्णालयात आता डायलिसीस केंद्र

● नाशिक, सचिन कदम :

महानगरपालिकेच्या नाशिकरोड येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालय आणि द्वारका येथील डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयात डायलिसीस केंद्र करण्यास महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली. मनपा रुग्णालयात ही सेवा नसल्याने रुग्णांना शासनाच्या संदर्भ सेवा रुग्णालयात ताटकळत रहावे लागते. नव्या सुविधेमुळे रुग्णांना जलदपणे ही सेवा मिळू शकणार आहे. दोन्ही रुग्णालयात प्रत्येकी १२ खाटांचे डायलिसीस केंद्र उभारण्यात येणार आहे. सध्या शालिमार येथील संदर्भ सेवा रुग्णालयात डायलिसीस केंद्र कार्यरत आहे. या ठिकाणी शहर व ग्रामीण भागातील रुग्ण डायलिसीस करण्यासाठी येतात. मनपा रुग्णालयात या प्रकारची सुविधा नसल्याने संदर्भ सेवा रुग्णालयातील केंद्रात मोठी गर्दी होते. रुग्णांना बरीच प्रतिक्षा करावी लागते. मनपाच्या रुग्णालयात डायलिसीस केंद्र कार्यान्वित केल्यास रुग्णांची विभागणी होऊन रुग्णांना लवकर ही सेवा देण्यात मदत होईल. नाशिक मनपाच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयात १० ते १२ खाटांचे डासलिसीस केंद्र करण्याची मागणी राष्ट्रवादीचे (अजित पवार) सरचिटणीस अर्जुन टिळे यांनी निवेदनाद्वारे केली होती. डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयात सुमारे ७०० चौरस फूट जागा उपलब्ध आहे. या जागेलगत प्रसाधनगृह आहे. या ठिकाणी आवश्यक ते बदल करून केंद्र सुरू करता येईल. तर नाशिकरोड येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालयाच्या तळघरात हे केंद्र कार्यान्वित होईल.




### प्रत्येकी १२ खाटांची व्यवस्था

- डॉ. झाकीर हुसेन आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालय या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी १२ खाटांचे डायलिसीस केंद्र उभारण्यात येईल, यंत्रसामग्री, विद्युतीकरण, वैद्यकीय अधिकारी व परिचारिका कक्ष, प्राणवायू यंत्रणेसाठी व्यवस्था आदींना एका केंद्रासाठी दोन कोटी १० लाख रुपयांचा खर्च गृहीत धरण्यात आला आहे. या दोन्ही केंद्रांसाठी चार कोटी २० लाख ६९ हजार रुपयांच्या खर्चाला सर्वसाधारण सभेत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.




# आयुष्मान भारत योजनेंतर्गत उपचार नाकारले, कर्करोग पीडिताने केली आत्महत्या

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

कर्नाटकची राजधानी बंगळुरूमधून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. एका ७२ वर्षांच्या कर्करोग पीडिताने प्रधानमंत्री आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेद्वारे उपचार नाकारल्याने आत्महत्या केली आहे. या घटनेतील पीडित कर्नाटक सरकारचा सेवानिवृत्त कर्मचारी होता. कर्करोगाचे निदान झाल्यानंतर १५ दिवसांनी त्याने हे पाऊल उचलले.

पीडित व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याने सांगितले की, "रुग्णाला जेव्हा हे लक्षात आले की, प्रधानमंत्री आयुष्मान भारत जन आरोग्य ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत त्याला ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यास रुग्णालयाने नकार दिला तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला. त्यानंतर त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले."

"आम्ही आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे ज्येष्ठ नागरिक कार्ड तयार केले होते. ज्याद्वारे त्यांना ५ लाखांचे विमा संरक्षण मिळते. तरीही किडवाई मेमोरियल इन्स्टिट्यूट ऑफ ऑन्कोलॉजीने, अद्याप राज्य सरकारचे आदेश आलेले नाहीत असे म्हणत हा लाभ नाकारला. पण त्यांनी आम्हाला उपचारांवर ५० टक्के सूट दिली," असे पीडिताच्या कुटुंबीतील एकाने सांगितले. याबाबत टाइम्स ऑफ इंडियाने वृत्त दिले आहे.

पीडित मृताच्या कुटुंबातील सदस्याने पुढे सांगितले की, "आम्ही नुकतेच चाचण्या आणि स्कॅन सुरू केले होते. यासाठी २०,००० रुपये खर्च केले होते. केमोथेरपीनंतर उपचारांसाठी मोठी शस्त्रक्रिया करावी लागणार होती. आम्ही किडवाई मेमोरियल इन्स्टिट्यूटमध्येच केमोथेरपीचे उपचार करण्याची तयारी केली होती. आम्ही पैसे देण्यास तयार होतो, पण त्यानंतर अवघ्या दोन दिवसांत त्यांनी आत्महत्या केली. मी असे म्हणत नाही की, हा प्रकार थेट लाभाच्या अभावामुळे झाला आहे."

"प्रधानमंत्री आयुष्मान भारत जन आरोग्य ज्येष्ठ नागरिक योजना अद्याप लागू झालेली नाही. आम्ही आदेशांची वाट पाहत आहोत," अशी प्रतिक्रिया केएमआयओचे प्रभारी संचालक डॉ. रवी अर्जुनन यांनी टाइम्स ऑफ इंडियाला दिली आहे.

# नागपूर विद्यापीठाच्या तिजोरीत ठणठणाट? तासिका प्राध्यापकांचे वेतन थकले

● नागपूर, नितीन देवळेकर :

नुकतेच आपले शतकोत्तर वर्ष साजरे करणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या चालू खात्यात ठणठणाट असल्याची माहिती आहे. बँकांमध्ये कोट्यवधींच्या मुदत ठेवी करण्यावर वित्त व लेखा अधिकारी हरीश पालिवाल यांचा भर आहे. यामुळे तासिका प्राध्यापकांचे अनेक महिन्यांचे वेतन थकले आहे. हरीश पालिवाल यांना यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी सर्व आरोप फेटाळून लावले. नागपूर विद्यापीठ हे मध्य भारतातील सर्वात जुने विद्यापीठ आहे.



तसेच या विद्यापीठाकडे अनेक दानदात्यांनी त्यांची संपत्ती दान केली आहे. यातून विद्यापीठाकडे कोट्यवधींची संपत्ती गोळा झाली आहे. पाचशे कोटींहून अधिक रकमेच्या मुदत ठेवी आहेत. असे असतानाही कंत्राटदार किंवा तासिका प्राध्यापकांचे वेतन रखडत असल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. विशेष म्हणजे, विद्यापीठाकडे येणाऱ्या पैशांच्या मुदत ठेवी करण्यावर भर असल्याची चर्चा आहे. यामुळे विद्यापीठाच्या चालू खात्यात ठणठणाट आहे. परिणामी, तासिका प्राध्यापक तीन महिन्यांपासून वेतनाविना आहेत.

### शासनाच्या नियमांना बगल

१४ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार, तासिका तत्त्वावर कार्यरत शिक्षकांना सेवार्थ प्रणालीद्वारे दर महिन्याला वेतन निर्गमित करणे गरजेचे आहे. असे असतानाही शैक्षणिक सत्र सुरू होऊनही वेतन प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडूनही दरवर्षी नियमित वेतन देण्यासंदर्भात आदेश दिले जातात. त्याकडेही दुर्लक्ष झाले आहे.

### मुदत ठेव कुणाच्या फायद्याची

नागपूर विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकाऱ्यांकडून विद्यापीठात असणारे जमा पैशांची वारंवार मुदत ठेव केली जात असल्याची माहिती आहे. भविष्यातील आवश्यक खर्च लक्षात न घेता चालू खात्यावरील पैशांची ही मुदत ठेव बनवली जात आहे. यामुळे वित्त अधिकाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे. विद्यापीठाला वारंवार मुदत ठेव करण्याची गरज काय असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### वित्त व लेखा अधिकाऱ्यांचे म्हणणे काय?

मुदत ठेवी केल्या जातात हा आरोप चुकीचा आहे. विभाग प्रमुखांकडून वेळेत प्रस्ताव आल्यास वेतन दिले जाते. यात काही अडचणी आल्या तरच वेतन रखडते. तासिका प्राध्यापकांचे वेतन थांबवणे हा उद्देश नाही. ते आमच्या विद्यापीठाचे कर्मचारी आहेत. त्यांचे वेतन वेळेत देण्यावर आमचा भर आहे, असे नागपूर विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी हरीश पालिवाल यांनी सांगितले.

# भारत नगरमधील बांधकामांवरील कारवाईविरोधात, ठाकरे गटाचे आंदोलन, कारवाईदरम्यान गोंधळ

● मुंबई, विशाल पाटील :

वांद्रे पूर्व येथील भारत नगरमधील १८० बांधकामांविरोधात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने गुरुवारी सकाळी कारवाई करण्यास सुरुवात केली. मात्र या कारवाईला स्थानिक रहिवासी आणि शिवसेनेने (उद्धव ठाकरे) जोरदार विरोध केला. शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) स्थानिक आमदार वरुण सरदेसाई आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी तात्काळ कारवाईच्या ठिकाणी धाव घेऊन कारवाई रोखून धरली. या कारवाईविरोधात आंदोलन सुरू केले. यामुळे येथे गोंधळाचे वातावरण



निर्माण झाले आहे.

झोपु प्राधिकरणाने भारत नगरमधील १८० बांधकामांवर नोटीसा बजावल्या होत्या. त्यानुसार झोपु प्राधिकरणाने या बांधकामावर हातोडा चालविण्याचा निर्णय घेतला. गुरुवारी ही कारवाई करण्यासाठी अधिकारी-कर्मचारी तेथे पोहचले. मात्र कारवाई सुरुवात होताच स्थानिक रहिवाशांनी त्यास विरोध केला. ही कारवाई बेकायदा आहे, आम्ही येथे ४० वर्षांपासून राहत आहोत, असे मुद्दे उपस्थित करीत काही स्थानिक रहिवाशांनी या कारवाईला विरोध केला. तर वरुण सरदेसाई यांनीही या कारवाईला विरोध करीत कार्यकर्त्यांसह आंदोलन सुरू केले आहे.

येथे १९७० पासून राहणारे रहिवासी पात्र असल्याचा दावाही त्यांनी केला. तसेच ही कारवाई अदानी समुहाच्या प्रकल्पासाठी केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, बांधकाम पाडण्यास संमती दिलेल्या रहिवाशांच्या घरांवर जेसीबी चालविण्यात येत आहे. मात्र काही रहिवाशांनी बांधकाम पाडण्यास संमती दिलेली नाही. असे असतानाही या घरांवरही कारवाई करण्यात येत आहे. याविरोधात सरदेसाई यांनी आंदोलन सुरू केले आहे.




# दुबईत सोन्याची कंपनी सुरु करण्याची थाप; त्रिकुटाने घातला ४५ लाखांचा गंडा

● वसई, सुचिता सोनावणे :

दुबईत सोन्याची कंपनी सुरू करण्याच्या नावाखाली नालासोपारा येथील एका इसमाला ठकसेनाच्या त्रिकुटाने तब्बल ४५ लाख रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार त्रिकुटाचा शोध सुरू आहे.विवेक राय (४५) हे नालासोपारा पूर्वेच्या अंबावाडी येथे राहतात. ते चालक म्हणून काम करतात. सप्टेंबर २०२३ मध्ये त्यांची ओळख भोला दुबे आणि निशा दुबे या दांपत्याशी झाली. या दोघांनी हरयाणा येथील नवीन चौधरी नावाच्या सोने व्यापाऱ्याची ओळख करून दिली. चौधरी हा दुबईत सोन्याची कंपनी सुरू करणार असल्याचे सांगितले. राय याच्या कंपनीत गुंतवणूक केल्यास ४ महिन्यात अनेक पटीने परतावा मिळेल असे आश्वासन दिले.